शिखांचा पंथ व इतिहास

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

[कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला]

१९८४

शिखांचा पंथ व इतिहास

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

[कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला]

१९८४

प्रकाशक :
गोपाळ मोकाशी,
कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला,
१७६ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

प्रथमावृत्ती :
५ डिसेंबर १९८४

किंमत :
सात रुपये

मुद्रक :
श्री. ग. दीक्षित
दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी,
वाई-४१२ ८०३. (जि. सातारा)

निवेदन

श्री. सदाशिव बागाईतकर ५ डिसेंबर १९८३ ला निवर्तले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून– १९३८–३९ पासून–अखेरपर्यन्त त्यांनी राजकीय व त्याच्याशी संबंधित अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केले.

त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात राष्ट्रसेवादलापासून झाली. त्यानंतर शेतकरी पंचायत, कामगार संघटना, समाजवादी पक्ष संघटन, बांगला देश स्वातंत्र्यलढा व शेवटी राज्यसभा सदस्य अशा विविध कार्यक्षेत्रांत त्यांनी समर्थपणे संचार केला.

स्वातंत्र्यपूर्व काळात तत्त्वाधिष्टित राजकारण होते व कार्य करीत असताना मूल्यांशी बांधिलकी होती. अशा काळामध्ये त्यांचा राजकीय पिंड बनला. शेवटपर्यन्त तत्त्व व मूल्य ह्यांची संगत व त्याकरिता लागणारा प्रखर लढा मित्रांपासून विरोधकांपर्यन्त त्यांनी दिला आहे. त्याचे उदाहरणच द्यावयाचे तर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या काळातील पाहण्यासारखे आहे. समिती त्या वेळी लोकप्रियतेच्या शिखरावर होती; पण भविष्यकाळाचा विचार ठेवून समितीमार्फत निवडणुका लढवू नयेत असे बागाईतकरांनी सुचविले– आग्रह धरला. हा त्यांचा आग्रह मुंबईच्या शिवाजी पार्कवरील सभेत विरोधी, प्रक्षुब्ध, प्रचंड जनसागराला त्यांनी समर्थपणे ऐकविला.

राजकीय जीवनात तत्त्वाचा, मूल्यांचा आग्रह धरीत असताना त्यांना राजकीय वनवास पत्करावा लागला, तरीही त्यांपासून ते ढळले नाहीत. असे असले तरी व्यक्तिगत संबंधात सहकाऱ्यांशी, कार्यकर्त्यांशी त्यांचे नाते जिव्हाळ्याचे, स्नेहाचेच होते.

प्रत्यक्ष कार्य करीत असतानाही त्यांनी वाचन, लेखन, तत्त्वचिंतन हे कटाक्षाने चालू ठेवले. राज्यसभेमध्ये बोलत असताना त्यांची त्या त्या विषयाची खोली, अभ्यास जाणवत असे व त्याबाबत कट्टर विरोधकांनाही त्याबाबत आदर होता.

तत्त्वहीन राजकारणाचे दुष्परिणाम आज आपल्यासमोर बिकट प्रश्नांच्या रूपाने आले आहेत. त्यांतून मार्ग काढण्याकरिता प्रश्नांचा सांगोपांग विचार करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. पंजाबचा प्रश्न उग्ररूपाने आपल्यासमोर आहे. ह्या विषयाशी संबंधित असाच ह्या व्याख्यानाचा विषय आहे व त्याची पुस्तिकाही आज प्रसिद्ध होत आहे.

श्री. सदाशिव बागाईतकरांच्या स्मृत्यर्थ आम्ही देशातील व समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा घडवून आणणे, पुस्तिका प्रसिद्ध करणे अशांसारखे प्रयत्न करण्याचे योजिले आहे. आयुष्यभर ज्या गोष्टी त्यांनी मोलाच्या मानल्या व ज्यांकरिता ते कटिबद्ध राहिले व जे आम्हाला मान्य आहे त्या दृष्टीने हा प्रयत्न.

उपक्रमाच्या पहिल्याच वेळी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या-सारखे पुरोगामी विचारवंत; ज्यांच्यामध्ये पौर्वात्य व आधुनिक विचारधारांचा मिलाफ झालेला आहे, म्हणूनच अधिक सकस, सखोल विचारधारा असलेले व्याख्यान व पुस्तिका आम्हास मिळाली ह्याबद्दल आम्ही स्वतःला भाग्यवान समजत आहोत. आमच्या विनंतीला त्यांनी होकार दिला व सर्व प्रकारचे सहकार्य देऊ केले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देत आहोत. या कामी श्री. रामभाऊ कोल्हटकर यांनीही आम्हाला मदत केली, त्यांचेही आभार.

या व्याख्यानांतून व पुस्तिकेतून आपणास प्रश्नांचे गांभीर्य समजेल व मार्ग काढण्यास प्रकाश दिसेल अशी आशा.

डॉ. कमल बागाईतकर
गोपाळ मोकाशी

व्याख्यान १ ले

शिखांचा धार्मिक इतिहास

व्याख्यान १ ले

शिखांचा धार्मिक इतिहास

शीख म्हणजे शिष्य. गुरूचा शिष्य. शीख हा शब्द शिष्य शब्दाचे पंजाबी प्राकृत रूप होय. येथे पंथ शब्दाचा अर्थ देवाकडे नेणारा मोक्षमार्ग. संस्कृतमधील पन्थ् धातूवरून साधित पंथ हे प्राकृत रूप मार्ग या अर्थी आहे. सगळे धर्म सरळ किंवा वाकड्या तिकड्या वळणांनी देवाप्रत पोचविणारे मोक्षमार्गच आहेत, असा हिंदू धर्मातील एक मूलभूत सिद्धांत आहे. सुमारे १० व्या शतकातल्या 'महिम्नस्तोत्र' या तत्त्वज्ञानात्मक शिवस्तोत्रामध्ये हा सिद्धांत मांडला आहे. त्यात म्हटले आहे की,

त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ।।

"वेद (ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन), सांख्य, योग, पाशुपत मत, वैष्णव इत्यादी भिन्नभिन्न मार्गांच्या बाबतीत हा मार्ग परम हितकारक, तो मार्ग परम हितकारक असे मानणारे व भिन्नभिन्न रुचींप्रमाणे सरळ किंवा वळणावळणाच्या मार्गाने जाणारे जन असतात; पृथ्वीवरील जलौघ समुद्रात जातात त्याचप्रमाणे ते सर्व तुझ्याकडे येत असतात." शीख पंथालाही असे म्हणता येते. शीख पंथाचे पहिले गुरू नानकदेव यांनीही असे म्हटले आहे की, मार्ग दोन असतात, पण ते एकाच स्थानाकडे जातात. नानकदेवांनी असेही म्हटले आहे की, 'सर्वांचा, हिंदू आणि मुसलमान यांचा एकच धर्म आहे; तो म्हणजे देवाची भक्ती. म्हणून मी असे म्हणतो की, मी हिंदूही नाही आणि मुसलमानही नाही.'

देवाचे दर्शन हे गुरुप्रसादाने म्हणजे गुरूच्या कृपेने प्राप्त होते. असा शीख पंथाचा प्रथम सिद्धांत आहे. हा सिद्धांत प्रथम प्राचीन उपनिषदांमध्ये सांगितला आहे. हा वेदान्तसिद्धांत आहे. "तो अमृतपुरुष परमेश्वर समजावून घेण्याकरता म्हणजे त्याचे ज्ञान होण्याकरता शिष्याने गुरूकडेच नम्र होऊन गेले पाहिजे. ज्याचे चित्त पूर्ण शांत आहे आणि जो नम्र आहे त्याला त्या सत्य परमेश्वराचे ज्ञान होते" (मुण्डकोपनिषद २-१२,१३). "ज्याची देवावर परम भक्ती आहे आणि त्याचप्रमाणे गुरूवर आहे त्या महात्म्याला वर सांगितलेली ही ब्रह्मविद्या प्राप्त होते" (श्वेताश्वतर उपनिषद ६-२३).

शीख पंथाची स्थापना पंजाबात झाली. या पंथाची उत्पत्ती, विकास व अंतिम परिणती पंजाबातच झाली. पंजाब म्हणजे सिंधू नदी व दिल्ली यांच्यामधील भूप्रदेश; सिंध प्रांत, सरहद्द प्रांत व हिमालय-जम्मुकाश्मीर वगळून बाकीचा भूप्रदेश. नानकदेवांपासून गोविंदसिंघांपर्यंत शीख पंथाचे १० गुरू पंजाबमध्ये झाले. दहांच्या नंतर अनेक संत झाले; पण या पहिल्या दहा गुरूंप्रमाणे ते गुरू नाहीत; असा खालसा शीख पंथाचा सिद्धांत आहे. गुरु गोविंदसिंघांनी यापुढे जे कोणी दीक्षा देणारे संत होतील त्यांना हे जे १० गुरू झाले त्यांची वाणी हीच प्रमाण होय. हे दहा गुरू म्हणजे- नानकदेव (१४६९-१५३९), अंगद (१५०४-१५५२), अमरदास (१४७९-१५७४), रामदास (१५३४-१५८१), अर्जुन (१५६३-१६०६), हरगोविंद (१५९५-१६४४), हरराय (१६३०-१६६१), हरकिशन (१६५६-१६६४), तेघबहादूर (१६२१-१६७५), गोविंदसिंघ (१६६६-१७०८).

गुरू नानक हे नुकतेच वयात आले असताना पंजाबची आणि एकंदर हिंदुस्थानची भयानक परिस्थिती त्यांना दिसली. या परिस्थितीचे त्यांनी अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. गुरूंची अनेक चरित्रे 'जनमसाखी' या नावाने लिहिली गेली आहेत आणि शिखांचा जो मुख्य धर्मग्रंथ 'गुरू ग्रंथसाहिब' याच्यामध्येही या परिस्थितीचे

वर्णन आलेले आहे. नानकदेव एके ठिकाणी म्हणतात– " हे युग म्हणजे रात्र होय; राजे हे खाटिक; धर्माला पंख फुटले व तो उडून गेला; असत्याच्या या काळोखी रात्री सत्याचा चंद्र मग कोठून उदयाला येणार ? मला तो दिसत नाही. " (मज्ह की वार). दुसरीकडे असे म्हणतात– " नम्रता गेली आणि धर्म नष्ट झाला आहे; कारण असत्याचे राज्य सुरू झाले आहे. मुसलमान मुल्ला आणि हिंदू पंडित हे आपली कर्तव्ये विसरले आहेत. लग्नाची शपथ दुष्ट राक्षस वाचून दाखवत असतो आणि तो हत्येचे स्तवन करीत राहतो. लोक चंदन अंगाला लावायच्या ऐवजी रक्ताने स्वतःला माखून घेतात. " " दिल्लीच्या तख्तावरून लोदी घराणे राज्य चालवत होते. त्यांच्या अखेरच्या सुलतानाने ही अमोल सत्ता मनमाने वापरून उधळून टाकली. त्यामुळे मुघल बाबर हा देशाची धुळधाण करीत चालला आहे, " असेही नानकदेवांनी म्हटले आहे. जनांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांची जबाबदारी नानकदेवांनी देवावर टाकली आहे. ते म्हणतात– " या सर्व सृष्टीच्या जनका, तुझ्यावर हा दोष येत नाही काय ? मुघल बाबरच्या वेषात तू यम पाठवला आहेस. काय भयंकर कत्तल होत आहे ! दुःखितांच्या आरोळ्या गगनभेदी झाल्या आहेत. अरे स्वामिन्, तुझ्यातली करुणा यामुळे जागी नाही का होत ? हे निर्मात्या, यात सगळी तुझीच जबाबदारी आहे. सगळी माणसे व सगळी राष्ट्रे यांच्याबद्दल तुला काही वाटावयास पाहिजे. एखाद्या बलवंताने तितक्याच बलवंता-वर हल्ला केला तर याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. याबाबत तक्रार का करावी ? कशी करावी ? परंतु जेव्हा गरीब जनावरांच्या, गाई–गुरांच्या कळपावर क्रूर वाघ हल्ला करतो तेव्हा त्याची जबाबदारी गुराख्यावर पडत असते. "

गुरू नानक जेव्हा नुकचेच वयात येत होते, २० वर्षांचे होते, तेव्हा सिकंदर लोदी दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाला होता. त्या परिस्थितीचे वर्णन ते करतात – " लाच घेत नाही आणि देत नाही असा कोणीच दिसत नाही. बादशाहाला

भरपूर लाच दिली तरच तो न्याय देतो." १५२१ मध्ये बाबरने हिंदुस्थानवर स्वारी केली. त्यावेळी भारतीय जनतेला बाबरने कसे छळले आणि नागवले; त्यांच्या कत्तली केल्या; याचे साक्षी गुरू नानक होते. तेव्हा नानक लाहोरपासून ५० मैलांवर असलेल्या एमिनाबाद (सैय्यदपूर) येथे होते. बाबरने मोठ्या प्रचंड प्रमाणात कत्तली केल्या आणि हजारो लोकांना कैद केले. कैद केलेल्या लोकांचे हाल केले. विशेषतः बायकांचा फारच छळ झाला. हे पाहूनच त्यांनी वर सांगितल्याप्रमाणे देवालाच दोष दिला.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवरून नानकदेवांच्या धर्मसुधारणेचा अर्थ स्पष्ट होतो. नानकदेवांच्या अगोदर सुमारे ३०० वर्षे लोकांच्या बोलभाषेमध्ये सर्व मानवांना समान असा भक्तिमार्गाचा व्यापक उपदेश करून सामान्य जनांना शुद्ध, सरळ, जातिभेदातीत व धर्मभेदातीत असा मोक्षधर्म सांगणारे संत झाले. जयदेव बंगालमध्ये, नामदेव आणि ज्ञानदेव हे महाराष्ट्रात; रामानंद आणि कबीर हे उत्तर प्रदेशात. जातिभेद, वर्णभेद वगैरे भेदांना देवाच्या भक्तिमार्गात स्थान नाही. हरिभक्त सगळे सारखेच, असा धार्मिक समतेचा विचार सर्व भारतात प्रसृत होत होता. सुलतानी जुलूम एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला मध्ययुगीन संतांचे हे भक्तिमार्गी आंदोलन. या दोन विरुद्ध प्रवृत्ती देशात दिसत असता नानकांचा जन्म झाला आणि त्यातच शीख पंथ आणि शीख समाज तयार होत गेला.

या संतांच्या भक्ति–आंदोलनात हिंदू-मुसलमान हा भेद आणि त्यांच्यातला मानसिक दुरावा नष्ट करण्याचाही हेतू स्पष्ट होता. या संतांनी एकच देव आहे आणि त्याच देवाची संतती म्हणजे माणसे होत. देवाला कोणत्याही नावाने हाका मारा– राम, हरि, गोविंद, ब्रह्म, परब्रह्म, अल्ला, खुदा. त्याचे नाव हृदयापासून घेतले, हृदय शुद्ध ठेवून, तर अखेर त्या देवाशी एकरूपता प्राप्त होते. याच संतांच्या आंदोलनामध्ये मुसलमान सूफी फकिरांचा संप्रदाय भारतात लोकप्रिय होऊ लागला.

नवीन पंथाचे संस्थापक म्हणून नानकदेवांचे चरित्र विशेष उद्‌बोधक आहे. भारताच्या भक्तिमार्गी संतांच्या उपदेशाचे सार-सर्वस्व नानकांनी आत्मसात केले. त्यावेळच्या हिंदू धर्मातील बारा-पेक्षा अधिक संतांच्या कविता शिखांच्या आदिग्रंथामध्ये समाविष्ट केल्या आहेत. त्याचप्रमाणे फरीदनामक सूफी साधूंच्याही कविता आदिग्रंथामध्ये, ग्रंथसाहिबामध्ये, समाविष्ट केल्या आहेत. जयदेव, नामदेव, रामानंद, रामानंदाचे शिष्य कबीर, धन्ना, रविरास, सेना, परमानंद, सूरदास, त्रिलोचन, मीराबाई, भिकना इत्यादी भक्तिमार्गी संतांची पदे आदिग्रंथात समाविष्ट झाली आहेत. यांपैकी अनेक संत देवाच्या राम-कृष्ण इ. अवतारांची पूजा करीत होते; त्यांचा महिमा गात होते. रामायण, महाभारत, भागवत इत्यादी ग्रंथां-तील भगवंताच्या अवतारांच्या लीला वर्णीत असत आणि त्यांच्या मूर्तींची जी तीर्थक्षेत्रे भारतात आहेत, तेथे जाऊन त्या मूर्तींची पूजा आणि आराधना करीत होते. यांच्या उलट अवतार व मूर्तिपूजा नानकांनी आणि नानकांनंतरच्या नऊ गुरूंनी अमान्य केली. मूर्तिपूजा वगळण्याने मोठ्या संख्येने मुसलमान भक्तांना व साधकांना नानकदेवांनी व शीख पंथाने आपल्यात समाविष्ट करण्यात यश मिळविले. प्रत्यक्ष वेदांमध्ये मूर्तिपूजा नाही. त्यामुळे एका अर्थी प्राचीन वैदिक परंपरेचा आधार शीख पंथाला प्राप्त झाला. वेदांमध्ये अवतारही नाहीत. मूर्तिपूजानिषेध व अवतारनकार ही शीख धर्माची वैशिष्ट्ये परंपरागत हिंदू संतमार्गापेक्षा वेगळी आहेत. परंतु मूर्ती ज्या देवांच्या असतात, त्या देवांची नामे म्हणजे हरी, गोविंद, कृष्ण, राम ही एकाच देवाची नामे आहेत असे हिंदूंचे तत्त्वज्ञान मानते; तसेच शीख पंथाने मानले. ऋग्वेदामध्ये म्हटले आहे की, ‘एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ’– “ एकच सत्य आहे, त्याचा निर्देश शहाणे निरनिराळ्या नावांनी करतात. ”

नानकदेवांचे चरित्र म्हणजे वरील विचारसरणीचे प्रत्यक्ष उदाहरण होय; ते थोडक्यात असे– संवत १५२६, वैशाख शुक्ल पक्ष, तृतीया (एप्रिल १५, १४६९) या तिथीस त्यांचा जन्म झाला.

त्यांच्या जन्मतिथीबद्दल वाद आहे; परंतु वर्षाबद्दल नाही. जन्मस्थान लाहोरपासून तलवंडी राय भोयी हे खेडे लाहोरपासून सुमारे ४० मैलांवर आहे. वडिलांचे नाव कल्याणराय आणि मातेचे नाव तृप्तादेवी. शिखांच्या मते लव आणि कुश यांच्या म्हणजे प्रभू रामचंद्राच्या वंशात क्षत्रिय घराण्यात दहाही गुरूंचा जन्म झाला. गुरू गोविंदसिंघांनी लिहिलेल्या विचित्र नाटकनामक एका चरित्रग्रंथात हेच सांगितले आहे. नानकदेवांचे घराणे लव-वंशी, त्यांचे आडनाव वेदी. त्यांचे पूर्वज किंवा आदिपुरुष म्हणा अमृतराय. ते वेदविद्यापारंगत होते. अनेक पंडितांना वाद–विवादात त्यांनी पराजित केले होते. तलवंडी हे नानकांचे जन्मस्थान आता पाकिस्तानात आहे. त्याला ' नानकाना साहिब ' असे नाव काही काळानंतर प्राप्त झाले. पंडित गोपाल पांडे आणि एक मुस्लिम मुल्ला यांच्या हाताखाली त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. व्रजनाथ शर्मा यांच्यापाशी संस्कृत शिकले. तलवंडी गावाला अनेक साधुसंतांच्या भेटी होत. त्यांच्या आणि भक्तजनांच्या चर्चेमध्ये नानक हे बालपणीच मन लावून लक्ष घालत व रमत होते. त्या वेदान्तचर्चेत त्यांना अत्यंत मूलगामी असा धार्मिक विचार प्राप्त झाला. मौलाना कुत्बुद्दीन यांच्यापाशी ते फार्सी शिकले. त्यावेळेस बालविवाहाची प्रथा होती. बहुसंख्य क्षत्रिय हिंदू बालकांचा १२–१४ व्या वर्षीच विवाह होत असे. तेव्हाच त्यांचा जानवे घालण्याचा म्हणजे उपनयनाचाही संस्कार उरकून टाकत. उत्तर हिंदुस्थानात क्षत्रिय व वैश्य यांच्यात अजून उपनयनाची चाल आहे. तेव्हाच उपनयन हे नुसते औपचारिक झाले होते. नानकदेवांनी यज्ञोपवीत घालण्याच्या अगोदर प्रश्न विचारला : ' याचा काय उपयोग ?' गुरुजींनी सांगितले : ' याच्यामुळे द्विजत्व प्राप्त होते; म्हणजे मनुष्याला दुसरा ब्रह्मजन्म प्राप्त होतो.' नानकांना ते पटले नाही. या यज्ञोपवीतासंबंधाने आदिग्रंथामध्ये नानक म्हणतात की, ' दया हा कापूस व संतोष हे त्यापासून बनवलेले सूत असेल तर ते कधीही तुटणार नाही, मलिन होणार नाही, जाळले जाणार नाही.' बाराव्या वर्षी सुलखनी या मूलचंदनामक

गृहस्थांच्या मुलीशी विवाह झाला. विवाहानंतर संसारात मुलगा लक्ष देईल असे आईवडिलांना वाटत होते; पण ते खोटे ठरले. साधु-संत, फकीर यांच्यात नानक हिंडत व त्यांच्यातच रमत. पुढे त्यांना श्रीचंद आणि लक्ष्मीदास असे दोन मुलगे झाले. वडिलांनी नानकांना व्यापारात घालण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्यांनी नीट लक्ष घातले नाही. नानकदेवांना त्यांच्या बहिणीने सुलतानपूरला नेले व आपल्या पतीच्या वजनाचा वापर करून नबाब दौलतखान लोदी याच्या कार्यालयात धान्यवाटपाच्या कोठारावर हिशेबनिसाची नोकरी लावून दिली. या व्यवसायात काही काळपर्यंत त्यांनी लक्ष देऊन चांगले काम केले आणि मालकाची मर्जी संपादन केली. सुलतानपूर येथील मर्दाना नावाचा तंतुवाद्याचा कुशल वादक याची मैत्री जोडली, हा मुसलमान होता. हे दोघे मिळून रात्रीच्या वेळी रोज स्वतःची रचलेली व निरनिराळ्या संतांची पदे गात भजन करीत. नानकदेवांना वरच्या दर्जाची धान्यवाटपाची नोकरी मिळाली होती; त्यात ते हिशेबनीस म्हणून काम करत होते. जे त्यांच्या भजनात सामील होत त्यांना जातपात भेद न करता ते भोजनातही सामील करून घेत. 'भजनात संगत व भोजनात पंगत' या शीख पंथाच्या धार्मिक आचारांची प्रथा या वेळी सुरू झाली. नानकदेव पहाटेस उठून सूर्योदयापूर्वी नदीत स्नान आटपत. (इ. स. १४९४) मध्ये एक दिवस स्नानास गेले असता तीन दिवस गुप्त झाले, प्रातः-काली नदीच्या काठी स्नान आटपून ध्यानस्थ बसले; दिव्यानुभवाची प्राप्ती झाली. एका जनमसाखीमध्ये म्हणजे शीख संतचरित्रामध्ये असे म्हटले आहे की, या दिव्यानुभवात चित्त देवाशी एकरूप झाले होते; देवाचे दर्शन झाले; देवाने अमृताचा चषक त्यांना प्यायला दिला आणि शुद्ध धर्मप्रसाराचा आदेश दिला. तो असा–

'नानक, मी तुझ्या सन्निध आहे. तू माझे (नाम) नाव विश्वात पसरून टाकशील. जो तुझ्या उपदेशास अनुसरेल त्याला मी संसारा-तून तारीन. जगभर जा; भजन करीत जा आणि जनांना भजनाचा मार्ग शिकव. लौकिक चालीरीतींच्या बंधनात पडू नको. देवाचे नाम,

दान, स्नान, सेवा आणि स्मरण म्हणजे तुझे जीवन. मी तुला सांगतो हे तुझ्या जीवनाचे मुख्य स्वरूप होय.' (जनमसाखी). नानकांना लगेच मूळ मंत्र स्फुरला– '३ॐ सत् नाम, करता, पुरुख, निरभऊ, निर्वैरू, अकालमूरति, अजोनि, सैभङ् गुरुप्रसादि।'

अर्थ– ३ॐ शब्दाचा अर्थ एकच देव. तो म्हणजे सत्य, तो सृष्टिकर्ता; पुरुष; तेथे भय नाही; आणि वैर नाही; त्याचे स्वरूप अकाल म्हणजे कालातीत आहे; त्याला जन्म नाही; तो स्वयंभू आहे; गुरूच्या कृपेने तो प्राप्त होतो.

१ हा अंक ॐ च्या अगोदर नियमाने शीख पंथाप्रमाणे लावावा लागतो. भगवद्गीतेत ॐ तत् सत् इति निर्देशो ब्रह्मणः स्मृतः। 'ॐ तत् व सत्' हा देवाचा (ब्रह्माचा) त्रिविध निर्देश होय असे म्हटले आहे. शीख पंथात देवाचा ब्रह्म, ॐ, व सत् असा निर्देश नियमाने करतात. ॐ व सत् असा नामजप करतात. ५ नियम आचारधर्म म्हणून गुरू नानकांनी सांगितले. नामसंकीर्तन, दान, नित्य स्नान, मनुष्यजातीची सेवा, देवाचे नित्य चिंतन म्हणजे स्मरण. यांच्या योगाने मोक्षप्राप्ती होते. मनुष्य देवरूप होतो.

नानकदेवांना देव हा गुरू लाभला. पातंजल योगदर्शनामध्ये देव हाच सर्व गुरूंचा आदिगुरू होय असे म्हटले आहे. आणि त्या आदि म्हणजे सर्वांत पहिल्या आद्यंतरहित गुरूचा वाचक शब्द प्रणव म्हणजे ओंकार होय असे तेथेच म्हटले आहे. देवाने गुरूपदेश नानकदेवांना केला तेव्हा त्याने सांगितले की, 'तू ज्याला आशीर्वाद देऊन अनुग्रह करशील त्याला मी आशीर्वाद देईन, त्याच्यावर अनुग्रह करीन. सर्वश्रेष्ठ देवाचा अनुग्रह प्राप्त झालेला तू गुरू आहेस. असे म्हणून देवाने त्याचा गौरव करून वस्त्र दिले. हा देवाचा अनुग्रह नानकदेवांना जेव्हा प्राप्त झाला तेव्हा ते तीन दिवस कोणाला दिसलेच नाहीत. लोक काळजीत पडले. लोकांना वाटले की नदीत ते वाहून गेले. त्यांचा मालक नवाब दौलत खान म्हणाला, 'मित्रहो नानकदेव नाहीसे झाले. मला फार दुःख होत आहे.' (जनमसाखी).

या साक्षात्कारानंतर वयाची वर्षे ३० पूर्ण झाल्यावर, ते प्रपंच सोडून विश्वयात्रेला निघाले. बरोबर मर्दाना या मुसलमान

तंतुवाद्य-विशारदाला घेतले. भारतभर व भारताच्या बाहेरही यात्रा करून आले. त्यांना जगामध्ये धर्मपंथांचे कार्य कसे चालते हे पहावयाचे होते. प्रथम (१४९६–१५०९) पंजाबच्या पूर्वेच्या भारतातील प्रदेशांची यात्रा केली. तेथील मोठमोठ्या हिंदूंच्या पवित्र तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. त्यानंतर (१५१०–१५१५) दक्षिणेची यात्रा केली. श्रीलंकेपर्यंत गेले. जैन व बौद्ध तीर्थक्षेत्रांनाही भेटी दिल्या. तिसरी यात्रा (१५१५–१५१७) उत्तरेस केली. काश्मीर आणि इतर हिमालयाचे भाग यांतील सुप्रसिद्ध सिद्धांच्या गाठीभेटी झाल्या. अखेरीस (१५१७–१५२१) पश्चिमेस इस्लामी देशांची यात्रा केली. अफगाणिस्तान, इराण, इराक व अरबस्तान येथील इस्लाम धर्माच्या प्रत्यक्ष स्वरूपाचे अवलोकन केले. या सगळ्या यात्रा पदयात्रा होत्या.

वैष्णव संत रामानंदांच्या शब्दांत नानक लोकांना सांगत की, ‘जाति पाति पूछै नहि कोई। हरि भजे सौ हरि का होई।’ जात–पात म्हणजे माणसामाणसांतले निरनिराळे जात, धर्म इत्यादी उच्च–नीच भेद विचारू नये. हरीचे जो भजन करतो तो हरीचा असतो. त्या वेळी हिंदू लोकांना विशेषतः ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांना परदेशगमनाचा निषेध होता. हा निषेध नानकदेवांनी मोडला. मक्का-मदीनांची यात्रा केली. त्यांना मक्केच्या काझीने विचारले, ‘तुम्ही कोण ?’ नानक म्हणाले, ‘मी मनुष्य आहे.’ पुन्हा विचारले, ‘तुम्ही मनुष्य खरे; पण हिंदू की मुसलमान ?’ नानकदेव उत्तरले, ‘देह हा पंचतत्त्वांचा आहे. तो हिंदू नाही, मुसलमानही नाही. ईश्वराने हे भेद निर्माण केले नाहीत.’ काझीने पुन्हा विचारले, ‘तुमच्याजवळ पुस्तक कसले आहे ?’ उत्तर दिले, ‘जगाच्या स्वरूपाचे हे पुस्तक आहे. हे माझे अन्न आहे; याच्यावर मी जगतो. हे पुस्तक वाचून आपण आणि परमात्मा यांच्या एकरूपतेचा साक्षात्कार होतो. म्हणजेच मी या पुस्तकावर जगतो.’ अरबस्तानात त्यांच्या गाण्याचा, संगीत भजनांचा फार चांगला परिणाम झाला. इतिहासकार म्हणतात की, बगदाद येथून निघताना नानकदेवांना तेथील खलीफाने संमानपूर्वक पोशाख दिला.

३० वर्षांची देशोदेशींची यात्रा संपविल्यावर रावीच्या पश्चिम तीरावर कर्तारपूरनामक शहर नानकदेवांनी वसविले. दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले. शिष्यांची संख्या वाढू लागली. शिष्यांमध्ये हिंदू–मुसलमान, स्पृश्य–अस्पृश्य, गुन्हेगार आणि सरळ सच्चे लोक, ठग–डाकू, श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, दलित या या सगळ्यांचा आदर करीत. जात–वर्ण–धर्म यांचा भेदाभेद न करता कोणाच्याही धर्माचा निषेध व खास पक्षपात न करता सर्वांचा ते आदर करीत. विश्व हे परमेश्वराचेच सत्य रूप आहे. ओं, राम, कृष्ण, हरी, गोविंद, अल्ला, खुदा इत्यादी शब्द हे त्याचे वाङ्मयीन रूप आहेत, असे ते समजावून सांगत. समाजाची दुःखे ते पद्यरचने-मध्ये, स्तोत्रामध्ये वर्णून सांगत. अहंकार व द्वैतभावना सोडून चित्तशुद्धी करणे आणि अंतश्चक्षूने परब्रह्म परमेश्वराचे, परम सत्याचे दर्शन घेणे, कायावाचामनेकरून देवाला सर्वस्व अर्पण करणे हे खरे धर्माचे रहस्य आहे, असे ते समजावून सांगत. सिद्धांशी, योग्यांशी, अन्य साधु–संतांशी वेळोवेळी ज्या आध्यात्मिक चर्चा होत त्या त्यांच्या ‘सिद्ध गोष्ठी’ प्रसिद्ध आहेत. बाह्य कर्मकांडाने चित्त शुद्ध होत नाही आणि नुसत्या नामजपाने देव जवळ येत नाही. याचा विस्ताराने त्यांनी बोध करून दिला, हे आदिगुरुग्रंथावरून समजते. लाखो वेळा तीर्थस्नाने केली तरी चित्त शुद्ध होत नसते. बगळे नेहमी तीर्थस्नान करत असतात व मासे नेहमी तीर्थातच असतात म्हणून काही त्यांना मुक्ती मिळत नाही. त्यांनी आपले मुख्य तत्त्वज्ञान आदिग्रंथाच्या ‘जपजी साहेब’ या प्रकरणा-मध्ये ग्रथित केले आहे. अफाट व भव्य विश्व त्यांच्या मनःचक्षूपुढे उभे होते. ते एके ठिकाणी म्हणतात– ‘लाखो पाताळे आणि लाखो आकाशे आहेत.’ त्यांनी प्रपंच सोडण्याचा व तापसी किंवा संन्यासी बनून भिक्षा मागण्याचा निषेध केला. गृहस्थाश्रमातच राहून परमार्थ-साधनेचा पुरस्कार केला. प्राचीन वेदकाळी केवळ गृहस्थाश्रमाचाच पुरस्कार करणारे काही आचार्य होते. त्यांच्या मताचा निर्देश गौतमधर्मशास्त्रात केला आहे. तो असा– ऐकाश्रम्यन्तु एके आचार्याः प्रत्यक्षविधानात् गार्हस्थ्यस्य ।

"वेदामध्ये गृहस्थाश्रमाचेच प्रत्यक्ष विधान केले असल्यामुळे गृहस्थाश्रम हाच मुख्य होय असे काही आचार्य म्हणतात." शेती, व्यापार, कारागिरी आणि शिपाईगिरी (क्षात्र धर्म) यांच्यापैकी कोणता तरी एक व्यवसाय किंवा अनेक व्यवसाय नेकीनें करून सत्याच्या मार्गाने जगणे हा मुख्य जीवनमार्ग होय, असे त्यांनी वारंवार उपदेशिले. सकाळ-संध्याकाळ नामसंकीर्तन हे नित्य कर्म सांगितले. अमृतवेळा म्हणजे ४।। वाजेपासूनचा प्रभात काळ हा विशेषत: स्नान करून नामजपाचा काळ होय, असे त्यांनी शिष्यांना सांगितले.

इ. स. १५३९ सप्टेंबरमध्ये आपली ज्योती दुसऱ्या गुरुजींच्या देहातील ज्योतीत सामावून आपला हा पांचभौतिक देह त्यांनी सोडला. हिंदू व मुसलमान दोन्हीही पंथांत त्यांचे भक्त होते.

'गुरू नानकशहा फकीर। हिंदूका गुरू मुसलमानोंका पीर।' अशी त्यांची त्या वेळी प्रसिद्धी झाली होती. नानकदेवांना या दोन्ही प्रकारच्या भक्तांना नाराज करायचे नव्हते. त्यांनी देह सोडताना सांगितले की, माझ्या मृत शरीरावर चादर घाला; ते पूर्ण झाकून टाका. एका बाजूला हिंदूंनी व दुसऱ्या बाजूला मुसलमानांनी फुले पसरावी. दुसऱ्या दिवशी ज्यांची फुले ताजी राहतील त्यांनी माझा देह घ्यावा. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी त्या चादरीवरील दोन्ही बाजूंची फुले ताजीच राहिली. चादर बाजूला केली तेव्हा तेथे देह सापडला नाही. ती चादर हिंदू-मुसलमानांनी अर्धी अर्धी फाडून घेतली. त्या एकाच ठिकाणी मध्ये आडवी भिंत घालून गुरुजींचे स्मारक बनविले.

गुरू नानकांनी आपल्या विशुद्ध धर्माला संघटित रूप देण्याचे कार्य केले. या संघटनेच्या दोन बाजू; एक–स्वतःचे पद्यरूप धार्मिक साहित्य लेखबद्ध करणे आणि दुसरे दीक्षा देऊन नव्या गुरूची गुरुगादीवर स्थापना करणे. नानकांनी गुरुपदी आपल्या पश्चात कोणी काम करावे हे मनात निश्चित केले. नानकांचा थोरला मुलगा श्रीचंद याने उदासी पंथ स्वीकारला. हा पंथ एक प्रकारचा बैरागी पंथ आहे. म्हणून श्रीचंदाला गुरुपदाची दीक्षा दिली

नाही. धाकटा मुलगा लक्ष्मीदास याचे मन प्रपंचात गढले होते. परमार्थाकडे त्याचा ओढा नव्हता. लेहणा नावाचा त्यांचा शिष्य होता. त्याच्या पित्याचे नाव पेरुमल खत्री व मातेचे नाव निहाल कौर होते. पेरुमलजी खडूर या गावी किराणा मालाचे दुकान चालवीत होते. श्रीनानकदेवांचे अनेक शिष्य लेहणाला भेटत असत. त्यांची शुद्ध धर्मनिष्ठा, शील पाहून तो नानकदेवांकडे आकर्षित झाला. नानकदेवांची सेवा लेहणाने सुरू केली. त्या सेवेमध्ये लेहणाची निष्ठा आणि ईश्वरभक्ती पाहून देहान्त समीप आला असताना त्याला गुरुगादीचा वारस केला. लेहणाला सन्मानपूर्वक उच्च स्थानावर बसवून त्याच्यापुढे ५ पैसे व एक नारळ ठेवला आणि त्याच्या समोर माथा टेकून आपली दिव्य ज्योती त्याच्या प्राण-ज्योतीत मिळविली. 'अंगद' हे त्याचे नाव दिले. या जगाचा निरोप घेऊन सचखंडात (सत्यलोकी) प्रयाण केले.

श्रीअंगददेव खडूरला गेले. गुरू नानक यांच्या पद्यरचनेची जमवाजमव करून एक शुद्ध प्रत लिहून तयार केली. त्यावेळच्या पंजाबी सामान्य जनांना समजेल अशी लिपी नानकदेवांच्या पद्य-रचनेची लिपी म्हणून ठरवली. कित्येकांच्या मते ही नवी लिपी त्यांनी तयार केली. ह्या लिपीमध्ये सद्‌गुरू नानकदेवांची पद्यरचना व त्यांचे चरित्र लिहून काढले. या लिपीस तेव्हापासून गुरुमुखी लिपी नाव पडले. त्यानंतर पंजाबी साहित्याची ही लिपी लेखनलिपी झाली. अंगददेवांनी गोविंदवाल नावाचे शहर वसविले. १३ वर्षे गुरुपद चालविले. अंतकाल जवळ आला आहे असे लक्षात घेऊन आपली १२ वर्षे सेवा करणाऱ्या अमरदासांची गुरुगादीवर स्थापना केली. गुरू अंगद यांनी चालविलेले कार्य त्यांनी पुढे अखंड चालू ठेवले. २६ मार्च १५५२ मध्ये अंगद समाधिस्थ झाले. अमरदास हे अंगदगुरूंच्या नात्यातले आणि त्यांच्यापेक्षा २५ वर्षांनी वयाने अधिक होते.

गुरू अमरदासांनी शीख पंथाचा मोठा आनंदोत्सवाचा नवीन सण सुरू केला. अमरदास हे गुरुपदी १५५२ साली विराजमान

झाले तेव्हा त्यांचे वय सत्तरच्या वर होते. शीख पंथाचा स्वीकार करीपर्यंत अमरदास वैष्णव पंथी होते. एका जनमसाखीमध्ये अमरदास हे भगवान रामचंद्रांचा बंधू भरत याच्या वंशातले होते, असे म्हटले आहे. अमरदासांनी जो शीख पंथाचा मोठा सण सुरू केला त्याला ' वैशाखी यात्रेचा महोत्सव' असे म्हणतात. अमरदासांनी शीख पंथाच्या प्रचाराकरता पंथाची दीक्षा घेतलेल्या २२ व्यक्तींना प्रचारक म्हणून नेमले. त्यांची प्रचारकेंद्रे हिंदुस्थानात व हिंदुस्थानाच्या बाहेरही निर्माण झाली. या २२ शिखांच्या केंद्रांमध्ये मानचिन्ह म्हणून एकेक खाट ठेवलेली असे. अशा २२ खाटा होत्या. या प्रचारकांनी नानकदेवांची जी पंगतपद्धत होती तिला मोठे रूप दिले. त्याला ' गुरु का लंगर ' असे नाव प्राप्त झाले. सगळ्या जातिजमातींची मंडळी दर्शनास आल्यानंतर या गुरु का लंगरमध्ये प्रसाद घेत. म्हणजे एका पंगतीत बसून जेवू लागली. प्रत्यक्ष अकबर बादशाहाने देखील या लंगरमध्ये जेवण घेतले अशी नोंद आहे. अमरदासांनी सतीची चाल शिखांमध्ये बंद केली. प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन त्यांनी स्वतः धर्मपंथाचा जोरदार प्रचार केला. त्यांनी पद्यरचनाही विपुल केली. त्यांचे रामकली रागातले ' आनंद 'साहेब हे गीत शीख समाजात दररोजच्या उपासनेत व मंगलप्रसंगी म्हणतात.

त्यांची कन्या भानी हिचे लग्न अमरदासांनी त्यांचे निष्ठावंत शिष्य रामदास यांच्याशी लावले. अमरदासांच्या भेटीला अकबर बादशहा आले असताना त्यांनी त्यांना तीन गुरूंच्या रचना म्हणावयास सांगितल्या. अकबर बादशहांना शंका होती की, यात मुसलमान धर्माविरुद्ध विचार असणार; परंतु रचना ऐकल्याबरोबर बादशहा प्रसन्न झाले व त्यांनी गुरूंना जहागिरी देण्याचे मनोगत प्रकट केले. अमरदासांनी नाकारले; तेव्हा बादशहांनी युक्ती काढली. भानी ही अमरदासांची कन्या. ती आपलीही मानलेली कन्या आहे, असे त्यांना सांगितले. कन्येला मी देणगी देऊ शकतो असे म्हणून पाच गावांची जहागिरी भानीला दिली. अमरदासजींनी नंतरचे गुरुगादीचे वारस

सोढी वंशातले रामदास यांना भानी दिली. या जहागिरीच्या जमिनीवर तलाव खोदला व सुंदर चौरस आकाराची त्याची बांधणी केली आणि भायी बुढाजी यांच्या ताब्यात गुरुगादीचा खजिना होता तो खजिना वापरून या भूमीवर ओळीने घरे बांधली. बाजारपट्टी तयार केली. रामदासांना गुरूंनी गोविंदवाल येथे बोलावून घेतले; यावेळी गुरुजी १०५ वर्षांचे झाले होते. पूर्वसंकेताप्रमाणे नानकदेवांच्या बेदी वंशाकडून सोढी वंशाकडे गुरुगादी जाण्याची वेळ आली आहे हे मनात आले. असे सांगितले की, आता आमचा काळ संपला आहे. गुरुगादीवर तुमची स्थापना करतो म्हणून रामदासांच्या कपाळी केशरी तिलक लावला. ५ पैसे व नारळ ठेवून माथा टेकला व ज्योतीत ज्योत समावून टाकली (इ. स. १५७४). या गुरुगादीवर चौथ्या गुरूंची स्थापना करण्याच्या वेळी अमरदासांनी 'सत् नाम श्री वाहे गुरु' असा उच्चार केला. गुरू रामदास यांनी रामदासपूर हे शहर भानीच्या भूमीवर वसविले. त्याच शहराला पुढे अमृतसर म्हणू लागले. गुरू रामदासांचे पुत्र भावी पाचवे गुरू अर्जुनदेव यांचा मित्र फकीर मियाँ मीर याच्या शुभ हाताने खोदलेल्या सरोवराच्या तीरावर हरिमंदिराची कोनशिला बसविण्यात आली.

गुरू रामदास यांनी पद्यरचनाही विपुल केली. या पद्यरचनेला 'आसादीवार' अशी संज्ञा आहे. या पद्यरचनेपैकी 'तो पुरखु' हे पद्य संध्याकाळच्या उपासनेत नित्यनेमाने म्हटले जाते. या २५ ओळींच्या एका पद्यात हरिनाम १८ वेळा आले आहे. गुरू रामदासांनी अमृतसर हे शीख पंथाचे केंद्र केले. त्यांच्या मागाहून आलेले त्यांचे कनिष्ठ पुत्र गुरू अर्जुनदेव यांनी या केंद्राची प्रतिष्ठा अपरंपार वाढवली. येथून अर्जुनदेवांनी शीख पंथाचे शेकडो प्रचारक देशभर पाठविले.

अर्जुनदेव यांचा जन्म त्यांच्या आजोळी गोविंदवाल या गावी इ. स. १५६३ साली झाला. अर्जुनदेवांचा सगळ्यांत वडिलभाऊ पृथ्वीचंद हा गुरुपदाला योग्य नाही हे गुरू रामदासांच्या लक्षात

आले व त्यांनी अंतकाळ जवळ आला असताना कनिष्ठ पुत्र अर्जुनदेवाला गुरुपदाची दीक्षा दिली. पंथातील निष्ठावंत आणि पूजनीय भायी बुढा आणि भाई गुरुदास यांच्या सल्ल्याने हा दीक्षासमारंभ घडून आला. पहिली अत्यंत महत्त्वाची गोष्ट अर्जुनदेवांनी केली ती म्हणजे हरिमंदिराची (सुवर्णमंदिराची) उभारणी. त्याची पायाभरणी लाहोरचे मुसलमान फकीर मियाँ मीर यांच्या शुभहस्ते झाली. या मंदिराचा चौथरा हिंदू मंदिराइतका उंच ठेवला नाही. या हरिमंदिराला चार दिशेस दरवाजे ठेवले. याचा अर्थ चारी वर्णांना मुक्त प्रवेश दिला. अमृतसरच्या दक्षिणेस ११ मैलांवर १५९० मध्ये तरणतारण हे सरोवर बांधले आणि त्याच्याजवळ एक मोठे मंदिर गुरुद्वारा व त्याच्याच जवळ कुष्ठरोग्यांकरता रुग्णालय बांधले. जलंदर दुआबमध्ये जाऊन कर्तारपूर शहराची स्थापना केली. फार मोठी बांधकामे अर्जुनदेवांनी पंजाबमध्ये केली. हजारो जाटांना धर्मदीक्षा दिली.

सगळ्यांत महत्त्वाचे काम म्हणजे गुरु ग्रंथसाहिबाची संपूर्ण बांधणी अर्जुनदेवांनी करण्यास सुरुवात केली; १६०४ मध्ये ती पूर्ण झाली. ह्या ग्रंथरचनेकरता आपल्या शिष्यांना गावोगावी पाठवून पहिल्या ४ गुरूंच्या पद्यरचनांच्या लिखित प्रती गोळा केल्या. भाई गुरुदास या शीख पंथीयाला ग्रंथसंशोधनपूर्वक शुद्ध प्रत तयार करण्याची कामगिरी दिली. ही गुरुग्रंथरचनेची वार्ता अकबर बादशहांच्या कानावर गेली. त्यांना असे कुणी सांगितले की, त्यात इस्लाम धर्माची निंदा आहे. बादशहांनी खात्री करून घेतली की, त्यात इस्लामवर कसलीही टीका नाही. त्या पवित्र ग्रंथापुढे ५१ सोनेरी मोहरा बादशहाने ठेवल्या. त्यावेळी भोवतालच्या प्रदेशात अवर्षणामुळे शेतकरी संकटात सापडले होते. गुरू अर्जुनांच्या विनंतीवरून अकबरांनी शेतकऱ्यांना कर माफ केला.

१६०४ साली ऑगस्ट महिन्यात ग्रंथसाहिबाची जुळणी पुरी झाल्यावर ती पवित्र प्रत सुवर्णमंदिरात ठेवण्याचा समारंभ साजरा झाला. भायी बुढाजी यांची ग्रंथी म्हणून म्हणजे पवित्र ग्रंथात प्रवीण

असलेला विद्वान म्हणून तेथे नेमणूक झाली. या ग्रंथसाहिबामध्ये नानकदेव, अंगददेव, अमरदास, रामदास व स्वतः अर्जुनदेव यांच्या संपूर्ण पद्यांचा समावेश केला आहे; परंतु त्याबरोबरच या गुरूंच्या पूर्वी व त्यांच्या समकाली झालेले भारतातले भक्तिमार्गी संत होते, जे भक्तिमार्गात जातिभेद व पंथभेद मानत नव्हते, त्यांच्याही निवडक पद्यरचना समाविष्ट केल्या. उदा., बंगालचे जयदेव, महाराष्ट्रातले नामदेव, उत्तर प्रदेशातील रामानंद, कबीर, धन्ना, सेना (न्हावी), रविदास (चांभार), परमानंद, सूरदास, त्रिलोचन, वेणि, भिकना, सद्धाना, पहिया, मीराबाई आणि फरीद नावाचे अनेक सूफी साधू यांची पद्ये या ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली आहेत. ही सगळी पद्ये रागदारीत म्हणायची प्रथा आहे. हिंदुस्थानी संगीतातील ३१ रागांमध्ये कोणकोणती पद्ये म्हणायची हेही ग्रंथसाहिबामध्ये निर्दिष्ट केले आहे. सगळ्या पद्यांची प्रकरणवारी ही बहुतेक त्या त्या रागाच्या शीर्षकाखाली अंतर्भूत केली आहे.

जेथे जेथे शीख पंथाचे समाज निर्माण झाले, तेथे तेथे या आदिग्रंथाचे मंदिर म्हणजे गुरुद्वारा उभारले आहे. या ग्रंथालाच गुरू मानायचे असा गुरू गोविंदसिंघांनी शीख पंथीयांना आदेश दिला आहे. म्हणून शिखांची जेवढी पवित्र मंदिरे वा देवळे आहेत त्यातला देव म्हणजे मध्यवर्ती ठिकाणी उच्च पदावर स्थापलेला गुरुग्रंथसाहिब होय. खरोखर उच्च विचारांचे ग्रंथ हेच त्या त्या ग्रंथकारापेक्षा चिरकाल टिकणारे माणसांचे गुरू होत. प्रत्यक्ष मनुष्यरूपी गुरू भेटो न भेटो. म्हणूनच महाराष्ट्रातले गुरू समर्थ रामदास यांनी अंतकाळी म्हटले की, "दासबोध हा ग्रंथ म्हणजे माझे स्वरूपच होय. म्हणून भक्तजनांनी माझा देहान्त जरी झाला तरी दुःखी होऊ नये, खेद मानू नये."

गुरू अमरदासांच्या वेळी (१५७२–७४) शीख पंथाला स्थानिक मुसलमानांकडून अपमान आणि धाकदपटशा सोसावा लागला. अनेकदा छळ होत असे. या बाबतीत अकबर बादशहा हा महत्त्वाचा अपवाद मानावा लागतो. पाचवे गुरू अर्जुन (१५८१–

१६०६) यांना जहांगीर बादशहांनी छळून मारले. याचे कारण अकबर बादशहाचा लाडका नातू व जहांगिरचा मुलगा खुशरो याला गुरू अर्जुनांनी मदत केली, पैसे दिले. या घटनेपासून मुस्लिम सत्ताधारी आणि शीख गुरू यांच्यामध्ये बेबनाव होऊन संबंध बिघडत गेले. सुलतानी किंवा बादशाही तख्ताला शरण जायचे नाही व आत्मरक्षणार्थ वारकऱ्यांनी धारकरी बनायचे ठरले. शिखांचे लढाऊ अकाल तख्त निर्माण होऊ लागले. वस्तुतः अर्जुनदेवांनी दिल्लीच्या बादशाही दरबारातील भानगडींपासून स्वत:ला अलिप्त ठेवले होते. जहांगीर आणि त्यांचा पुत्र खुशरो यांच्याकडे गुरू अलिप्त-दृष्टीनेच बघत होते. परंतु खुशरो बापाला भिऊन काबूलला पळून जायला निघाला तेव्हा अर्जुनदेवांपाशी येऊन मदत म्हणून पैशाची भिक्षा त्याने मागितली. गुरूंनी ती प्रथम नाकारली. गुरू म्हणाले, आमच्या खजिन्यात जे असते ते गरीब दीनदुबळ्यांकरता ठेवलेले असते. खुशरो म्हणाला, मीही गरीब दीनदुबळा आहे. गुरूंना करुणा आली व काही हजार रुपये त्यांनी दिले. कालांतराने खुशरोला जहांगीरने पकडले. जहांगीरच्या मनात या शीख गुरुसंप्रदायाबद्दल द्वेषाची भावना वाढत होती. लक्षावधी हिंदू व मुसलमान गुरु-गादीच्या प्रभावाखाली आलेले दिसत होते. बादशहाच्या मनात आले की, हे गुरूंचे बंड मोडले पाहिजे आणि या गुरूला मुसलमान बनविले पाहिजे. म्हणून जहांगीरने कुरापत काढण्यास सुरुवात केली.

गुरू अर्जुनदेवांना मुसलमान तरी करावयाचे किंवा नष्ट करावयाचे, असा बेत जहांगीर बादशाहांनी मनात केला. लाहोरला अर्जुनदेवांना बोलावून घेतले. खुशरोला मदत केल्याबद्दल २ लाख रु. दंड केला आणि आदिग्रंथातून काही कविता काढून टाकण्याचे फर्माविले. गुरूंनी दोन्ही गोष्टी करायच्या साफ नाकारल्या. तेव्हा (तूझुक-इ जहांगीरी पृ. ३५) जहांगीर बादशहा म्हणतात ' मी त्याला पकडण्याचा हुकूम काढला. अर्जुनदेवाच्या मालकीच्या इमारती, राहण्याची अनेक ठिकाणे आणि मुलगे मूर्तजाखानाच्या स्वाधीन केले. अर्जुनदेवाची सगळी संपत्ती जप्त केली आणि अर्जुनदेवाला हालहाल

करून मारण्याबद्दलही हुकूम दिला.' त्यांना एका किल्ल्यात बंदिवान म्हणून ठेवले. त्या किल्ल्याजवळून रावीचा प्रवाह वहात होता. मे महिन्यातील कडक उन्हामध्ये गरम वाळवंटात अर्जुनदेवांना बांधून टाकले; नंतर त्यांच्या अंगावर उकळते पाणी ओतले. सबंध अंगावर भाजल्यामुळे फोड आले. (३० मे १६०६ ला) रावीमध्ये पहाटेस त्यांनी उडी टाकली. रावीमध्ये उडी टाकताना सुखमनी नावाचे भक्तिकाव्य गात आणि देवाच्या नावाचा उच्चार करीत ते बुडाले. वय केवळ ४२ वर्षांचे होते.

अर्जुनदेवांच्या कारकीर्दीपर्यंत शीख समाज हा केवळ धार्मिक समाज होता, त्यांची संघटना वाढत होती. प्रभाव हिंदू-मुसलमान समाजावर पसरत होता. मोगल तख्ताशी हा समाज इमानी राहिला. अकबर बादशाहांना तर शीख संप्रदाय आवश्यक वाटत होता; कारण त्यामुळे प्रजेत शांतता आणि सुव्यवस्था राखता येत होती. परंतु गुरू अर्जुनदेवांच्या अशा प्रकारच्या वधाचा उलटा गंभीर परिणाम शीख समाजावर झाला. नंतर अर्जुनदेवांचे पुत्र हरगोविंद हे गुरुगादीवर आले. त्यावेळेस ते ११ वर्षांचे होते. पिताजींकडून त्यांना शेवटचा आदेश मिळाला. "गुरुगादी हे राजसिंहासन समजा. त्यावर सशस्त्र आरूढ व्हा आणि भक्तांचे सैन्य संघटित करा." या शेवटच्या आदेशाप्रमाणे आध्यात्मिक शक्तीच्या व ऐहिक शक्तीच्या दर्शक अशा दोन 'पिरी' व 'नीरी' या नावाच्या समशेरी गुरू हरगोविंद अंगावर बाळगू लागले. त्यांनी अनुयायांना सांगितले की, या गुरुद्वारामध्ये भक्ती आणि भुक्ती यांचा संगम झाला पाहिजे. माझी जपमाळ म्हणजे तलवार लटकावयाचा पट्टा! माझ्या शिरस्त्राणावर राजासारखा रत्नांचा शिरपेच दिसेल. गुरूंनी चांगले धडधाकट शिष्य गोळा करून त्यांना सशस्त्र केले आणि कवायत शिकविली. आपल्या देहरक्षक ५२ शिपायांच्या ताब्यात ७०० घोडे, ३०० घोडेस्वार आणि ६० बंदूकधारी दिले. मांसाहार आणि शिकार यांची परवानगी दिली. स्वत: गुरू वाकबगार शिकारी होते. शिकार करून संध्याकाळी आणलेले वन्य पशू शिष्यांना आणि गरीब लोकांना वाटून टाकत.

या गुरूंनी अमृतसरला लोहगड नावाचा पोलादी किल्ला बांधला. १९०९ साली हरिमंदिराच्या समोर अकालतख्त (अमर ईश्वराचे सिंहासन) बांधून काढले. हे सर्व पाहून गुरू हरगोविंदांना शिष्यमंडळी 'सच्चा बादशाहा' म्हणू लागली. अकालतख्तमध्ये बसून गुरू एखाद्या राजाप्रमाणे न्यायदान करीत आणि नजराणे स्वीकारीत. मृत्यूला न भिणाऱ्या शूरांच्या कथा गर्जत म्हणणारे शाहीर त्यांनी पोसले. भक्ती आणि शक्ती यांचा संगम साधून लढाऊ शीख संप्रदाय निर्माण होण्यास सुरुवात झाली. एका प्रकारे मोगल राज्याच्या पोटामध्येच हे नवे राज्य निर्माण झाले. करवसुलीची पद्धत व्यवस्थित केली. नानकदेवांनी सुरू केलेली संगत ईश्वराचा आशीर्वाद मागणारी सेना बनली.

ही परिस्थिती कळल्यावर जहांगीर बादशाहाचा क्रोध अधिकच भडकला. बादशाहांनी हरगोविंदला पकडून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात अनेक वर्षे कोंडून ठेवले. हा बंदिवास १२ वर्षांचा होता की, ३ वर्षांचा होता, याबद्दल इतिहासकारांमध्ये वाद आहे. त्यांना ३ बायका होत्या; त्यांच्यापासून ६ मुलगे झाले. ग्वाल्हेरच्या किल्ल्यात इतरही अनेक राजांना बादशाहाने बंदिस्त केले होते. त्यांच्यापासून गुरूंनी राजकारणी डावपेचांचे आणि मुत्सद्देगिरीचे धडे घेतले. १६२१ मध्ये जहांगीर बादशाहांनी धोरण बदलले; ठरविले की, गुरू हरगोविंदांशी झगडण्यापेक्षा मैत्री करावी; कारण शीख संप्रदाय वेगाने पसरत होता; प्रजेमध्ये बेदिली माजत गेली तर बंडाचे उठाव होतील. गुरू हरगोविंदांवर बादशाहांनी पंजाबची शांतता व सुव्यवस्था सोपविली. ४०० घोडे, हजारांचे पायदळ आणि ७ तोफा गुरूंना बहाल केल्या. गुरूंची स्वतःची सेना अगोदर होतीच; त्यात ही भर पडली. गुरूंना मनसफदारीचा दर्जा देण्याचे बादशाहांनी ठरविले; परंतु गुरूंनी ते नाकारले. बादशाहा काश्मीरला गेले तेव्हा त्यांनी बरोबर गुरू हरगोविंदांना नेले. काश्मीरहून परतताना १६२७ मध्ये राजौरी येथे जहांगीर मृत्यू पावले.

शहाजहान या जहांगीर नंतरच्या नव्या बादशाहांना इमान राखण्याचे आश्वासन देऊन गुरू अमृतसरला परतले. १६३२ मध्ये

शहाजहान काश्मीरमधून राजौरी मार्गाने परतत असताना असे दिसले की, राजौरी, गुजरात इ. ठिकाणी हिंदू लोक मुसलमान मुलींना हिंदू धर्माची दीक्षा देऊन लग्न करू लागले आहेत. शहाजहानला हे मुळीच खपले नाही. त्यांनी फतवा काढला की, सगळ्या मुस्लिम विवाहित स्त्रियांनी आपल्या हिंदू नवऱ्यांना सोडले पाहिजे आणि हिंदूशी लग्न केल्याबद्दल दंड दिला पाहिजे. काही स्त्रियांना व पुरुषांना त्यांनी देहांताचीही शिक्षा दिली. साडेचार हजार स्त्रियांना मुसलमान धर्मात बादशाहांनी परत आणले.

शहाजहानकडून होणारा हा छळ गुरू हरगोविंदांच्या जेव्हा लक्षात आला तेव्हा त्यांनी या गोष्टीत हस्तक्षेप केला. बादशाहाचा हुकूम मानला नाही आणि शेकडो हिंदू झालेल्या मूळच्या मुसलमान असलेल्या महिलांना संरक्षण दिले. शहाजहान बादशाहांना ही बंडखोरी सहन झाली नाही. जहांगीर बादशाहांनी गुरूंना दिलेला पंजाबच्या सुभेदारीचा अधिकार काढून घेतला. एक लष्कराची तुकडी गुरूंचे पारिपत्य करण्याकरिता रवाना केली. अमृतसरजवळ १६२८ मध्ये संग्राना येथे त्या लष्करी तुकडीची गुरूंच्या भक्तसेनेने दैना केली. लष्कराच्या अधिकाधिक मोठ्या पलटणी गुरूंवर एकापाठीमागून एक अशा पाठवल्या. त्या सगळ्यांचा गुरूंनी निःपात केला. गुरूंच्या शौर्याची कीर्ती पसरू लागली. सैन्याची भरती त्यामुळे वाढत गेली. अमृतसर जिल्ह्याच्या उत्तरेस गुरूंनी हरगोविंदपूर नगर वसविले.

लाहोरच्या मोगल सरदाराला एकदा गुरूंना काबूलहून भेट म्हणून आलेल्या दोन उमद्या घोड्यांचा मोह पडला. ती घोड्यांची जोडी हिरावून घेण्याकरता एक लष्कराची तुकडी गुरूंवर हल्ला करण्याकरता त्या सरदाराने पाठविली. त्या तुकडीचाही गुरूंच्या सैन्याने फडशा पाडला. या लढाईत दोन्ही बाजूंचे शिपाई मोठ्या प्रमाणात कामास आले, पण गुरूंची फत्ते होत गेली. अशा तऱ्हेच्या अनेक मोगल सरदारांशी गुरूंच्या लढाया झाल्या. अखेरची लढाई जलंदरजवळच्या कर्तारपूर या शहराजवळ झाली. लढायांत खूप खर्च झाला. सैन्याचा खर्च करणे कठिण झाले. सपाट प्रदेश सोडून

डोंगरी प्रदेशात रहावयास गेले. डोंगरांच्या रांगांनी भरलेल्या भागावर राजा ताराचंद याची सत्ता होती. त्याने शहाजहान बादशहाची अधिसत्ता नाकारली होती. कांग्रा आणि चंबा या डोंगराळ प्रदेशातील अनेक राजपूत सरदारांनीही शहाजहानची अधिसत्ता त्याच वेळी नाकारली होती. साधनसामग्री फार थोडी राहिल्यामुळे गुरू ताराचंदच्या किरातपूर या राजधानीमध्ये राहू लागले. आयुष्याची शेवटची दोन वर्षे मुसलमानांना हिंदू धर्माची दीक्षा देण्यात घालविली. तिबेट आणि खोतान यांच्या सरहद्दीपर्यंत पसरलेल्या या डोंगरी विभागात मुसलमान हे नावही ऐकू येईनासे झाले असे मोहसिन फनी हा ही परिस्थिती प्रत्यक्ष पाहून लिहितो. मोहसिन फनी हा किरातपूर येथे गुरूंना भेटला. त्याने स्वतः पाहिलेली वरील हकीकत लिहिलेली आहे. राजकीय गुलामगिरीतून मुक्त करून घेण्याकरता काय केले पाहिजे, ही गोष्ट गुरू हरगोविंद यांनी स्वतःच्या आचरणाने हिंदूंना दाखवून दिली. जगातील एका तत्कालीन वरिष्ठ बादशाही सत्तेशी अविश्रांतपणे एक भक्तिमार्गी संत लढत राहतो ही गोष्ट शतकानुशतके हिंमत गमावलेल्या हिंदूंच्या मनात फार उशीरा प्रथम लक्षात आली. समर्थ स्वामी रामदास गुरू हरगोविंदांच्या समयी पंजाबमध्ये यात्रा करत होते. त्यांना पहिल्यांदा सशस्त्र भक्तिमार्गी हे दृश्यच विसंगत वाटले; परंतु गुरूंशी चर्चा केल्यानंतर त्यांना त्यातील सत्य पटले हे महाराष्ट्राच्या समर्थकालीन इतिहासावरून नीट लक्षात येते. गुरू हरगोविंद ३ मार्च १६४४ मध्ये कालवश झाले. गुरू हरगोविंदांच्या नंतर हरराय व हरकिशन हे क्रमाने नातू आणि पणतू अल्पकाळ गुरुगादीवर आले (१६४४–६१, १६६१–६४).

त्यांच्यानंतर हरगोविंदांचा सगळचात धाकटा मुलगा तेघबहादूर गुरुगादीवर आला (१६६४). या गुरू तेघबहादुरांच्या कारकीर्दीत औरंगजेब बादशहा मुस्लिम धर्मी राज्य भारतात स्थापण्याच्या दृढ निश्चयाने मोगल तख्ताची ताकद पणास लावून राज्य चालवू लागले. अनेक गुरुद्वारे जमीनदोस्त केली. १६७४–७५ या

अवधीत औरंगजेब पंजाबमध्ये होते. त्यांच्या हुकमाने अगणित हिंदूंना अधिकाऱ्यांनी जबरदस्तीने बाटवून मुसलमान केले. हिंदू जनतेवर अत्याचार व दडपशाही सुरू केली. काश्मीरमध्ये हजारो ब्राह्मण पंडितांना जबरदस्तीने मुसलमान केले. गुरू तेघबहादुरांना धार्मिक स्वतंत्रतेच्या विरुद्ध चाललेल्या या बादशाही कारभाराचा भयंकर राग आला. पूर्व पंजाबमध्ये त्यांनी दौरा काढला आणि हिंदू जनतेला धीर दिला; त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. काही काश्मीरी हिंदूंनी औरंगजेब बादशाहांना सांगितले की, अगोदर गुरू तेघबहादुरांना मुसलमान करा व मग आमच्याकडे या. औरंगजेबाच्या यावेळी लक्षात आले की, गुरू हे काश्मीरी जनतेला म्हणजे पंजाबातील जाट शेतकऱ्यांना बंडासाठी उत्तेजित करत आहेत. औरंगजेब बादशाहांना सरहद्दीवरील जमातींच्या भयंकर बंडाचा बीमोड करण्यात फार दगदग पडली आणि ते निराश झाले. पंजाबमध्येही असेच बंड उभे रहात आहे असे लक्षात आले. दिल्लीला परतले आणि तेघबहादुरांना दिल्लीस बोलावून घेतले. गुरूंनाच सांगितले की, चमत्कार तरी करून दाखवा नाहीतर मुसलमान व्हा. गुरूंनी सांगितले की, मी चमत्कार करत नाही आणि धर्मही बदलणार नाही. गुरूंना दहशत बसवण्याकरता भाई मोतीदास या त्यांच्या शिष्याला खांबाला बांधून डोक्यापासून पोटापर्यंत करवतीने गुरूंच्या देखत चिरले. तरी गुरू निश्चल राहिले. अखेरीस बेडचा घालून ११ नोव्हेंबर १६७५ मध्ये गुरूंचा बादशाहांनी शिरच्छेद केला. गुरू तेघबहादुरांनी त्यांचा शूर पुत्र गुरुगोविंद याला अगोदरच गुरुगादीवर बसविले. हिंदूंची दुःस्थिती आणि दुर्बल जीवनपद्धती पाहून त्यांना जुलमाविरुद्ध आणि भ्रष्टाचारी सरकारविरुद्ध लढा करण्यास उद्युक्त केले. हिंदू धर्म दडपून टाकण्याची ती मोगली सत्तेची मग्रूर राजनीती संपवण्याचा निश्चय गुरुगोविंदांनी केला. हा निश्चय म्हणजे इस्लामविरुद्ध लढ्याचा निश्चय नव्हे तर जुलमी सरकारविरुद्ध लढण्याचा निश्चय होता. ते मुसलमानांच्या विरुद्ध मुळीच नव्हते. अनेक मुस्लिम संतांचा पाठिंबा त्यांनी मिळवला होता. सइद बेग मैनुखान हे गुरूंच्या बाजूने मोगलांच्या

विरुद्ध लढले. मोगलांचे लष्कर गुरूंना पकडण्याकरता शोधत होते तेव्हा नबी खान व घनी खान यांनी गुरूंचा बचाव केला. काजी पीर मुहंमद यांनीही गुरूंचा पत्ता लागू दिला नाही. अनेक मुसलमान सरदारांचा पाठिंबा मिळाल्यामुळे गुरूंना नेस्तनाबूत करण्यात लाहोर आणि कांगडा येथील मोगली सुभेदारांना यश येऊ शकले नाही. दिल्लीचे सरकारच डळमळीत झाले होते. डोंगरी प्रदेशातील दऱ्या-खोऱ्यातील राजांनी मोगली सत्तेला झुगारून दिले होते. औरंगजेब शिरजोर होऊ लागणाऱ्या दक्षिणेकडील राजवटीच्या बंदोबस्ताकरता दक्षिणेत गुंतून पडले व रुतून बसले. ही फार अनुकूल संधी आहे हे गुरूंच्या लक्षात आले. शिवालिक पर्वतराजीमध्ये नांदणाऱ्या राजपूत लढवय्या वर्गाला चेतवण्याचा गुरूंनी प्रथम प्रयत्न केला. परंतु काही काळ प्रयत्न करूनही जमत नाही हे लक्षात आले. तेव्हा आपल्या शीख पंथावरच ते विसंबायला लागले.

संस्कृत पुराणांचा खोल अभ्यास गुरूंनी केला होता, त्यात त्यांना असे आढळले की, देव साधूंच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या संहारार्थ तारक व्यक्तीला पाठवीत असतो. ह्यासमयी त्या देवाने याच उच्च उद्देशाने मला या पृथ्वीतलावर भारतवर्षात पाठविले आहे. विचित्रनाटक नावाचे आत्मचरित्र गुरू गोविंदांनी लिहिले आहे. त्यात मुख्यत: या दोन गोष्टींचा निर्देश केला आहे; एक म्हणजे देवाशी संवाद घडला आणि देवाचा आदेश मिळाला की साधूंचे रक्षण आणि दुष्टांचे दमन कर. आणि दुसरे असे की, हा आदेश त्यांनी मान्य केला आणि त्या आदेशाप्रमाणे शिष्यांना प्रवृत्त करण्याचे आश्वासन दिले. चंडीचरित्र गुरू गोविंदांनी लिहिले आहे. त्यात म्हटले आहे की, देवाने ज्याप्रमाणे दुष्टसंहारार्थ दुर्गेला पाठविले त्याप्रमाणे मलाही देवाने पाठवले आहे. देवीचा आशीर्वाद त्यांनी मागितला. चंडीचे स्तोत्र ऐकल्यानंतर भित्र्यांनाही धैर्य येते आणि शूरांना चौपट स्फूर्ती प्राप्त होते. दुर्गा ही स्त्री, तिला ज्या गोष्टी यशस्वी रीतीने पार पाडता आल्या, त्या शूर पुरुषाला का पार पाडता येऊ नयेत ? गुरूंच्या सेवेला अनेक पंडित होते. त्यांनी

चंडीहोमाचा महोत्सव करण्याचा सल्ला दिला. हा महोत्सव आनंदपूर जवळील नैनादेवीच्या डोंगरावर पार पडला. तो दुर्गाष्टमीला १६९८ ऑक्टोबरमध्ये सुरू झाला आणि २१ मार्च १६९९ मध्ये पूर्ण झाला. पंडित उच्चस्वरात मंत्र म्हणत होते तेव्हा गुरू पुढे आले. म्यान केलेली तलवार बाहेर उपसली आणि म्हणाले, हा होमाचा सोहळा ६ महिने चालला; परंतु दुर्गा देवीचे दर्शन होऊ शकले नाही. ही पहा दुर्गा देवी. म्हणून लखलखीत तलवार उंच करून दाखवली. ही गोष्ट २८ मार्च १६९९ मध्ये घडली.

त्या महोत्सवात जमलेल्या जनतेला आनंदपूर येथे पुन्हा वैशाख प्रतिपदेस (३० मार्च १६९९) जमण्यास सांगितले. तेथे हजारो लोक जमले. मोठी मेजवानी दिली गेली. गुरू समाधीमध्ये निमग्न होते. मोठा मंडप उभारला होता. त्यात समाधीतून उठल्यावर गुरू येऊन उभे राहिले व त्या महासभेला त्यांनी सांगितले – धर्मावर आक्रमण होत आहे. सगळे युद्धास सज्ज व्हा. काळ असा आला आहे की, कोणी वीट अंगावर झुगारली तर दगडाने उत्तर दिले पाहिजे. नम्रता व सेवा एवढे सद्गुण पुरेसे नाहीत. साधुत्व संपादन करायचे आणि दुष्टांचा संहारही करायचा हे महत्त्वाचे कार्य आहे. देव, गुरू आणि तलवार ही त्रयी (ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्यांच्याऐवजी) परित्राण करील. मोक्ष मेल्यानंतर नाही मिळवावयाचा. याचि देही याचि डोळा मोक्ष प्राप्त करून घ्यावयास पाहिजे. तलवार हा देव व देव हा तलवार आहे. ही तलवार शूरांचे राष्ट्र निर्माण करील. अंतिम त्यागाला तयार व्हा. देव, सत्य आणि धर्म यांच्या सेवेकरता शिर कोण देण्यास तयार आहे अशी तीनदा पृच्छा केली. लाहोरचा दयाराम खत्री पुढे आला. शेजारच्या सर्व बाजूंने बंद असलेल्या तंबूमध्ये त्याला नेले. तलवारीने एका बोकडाचे शिर छाटले आणि ती रक्ताने माखलेली तलवार घेऊन पुन्हा सभेपुढे आले आणि म्हणाले दुसरा कोण आणखी शिर द्यायला तयार आहे? धरमदास जाट पुढे आला. असे ५ वेळा घडले; ५ शूर मिळाले. त्या पाचांनाही घेऊन त्या सभेपुढे प्रकट झाले आणि सभेमध्ये या पाचांना विशिष्ट

पोशाख दिला. एक नवीन प्रकारचा संस्कार करून दीक्षा दिली. ही दीक्षा घेतलेला खालसा म्हणजे पवित्र होतो. हे पहिले खालसा पंथातील लोक म्हणजे पंचकप्यारे होत. याच्या अगोदर दीक्षा घ्यावयाची पद्धत म्हणजे 'चरणपहल' गुरूचे पाय धुवून व अंगठे धुवून ते पाणी शिष्याने प्राशन केले म्हणजे दीक्षा पूर्ण होई. गुरू अर्जुनदेवांच्या वेळी गुरुचरणप्रक्षालनाऐवजी गुरू ज्या खाटेवर वा लाकडी बैठकीवर बसत तिच्या खाली एका पात्रात पाणी ठेवायचे. ते पाणी अंगावर शिंपडून थोडेसे प्राशन करून हा विधी पूर्ण होत असे व ती व्यक्ती शीख झाली असे मानण्यात येई. गुरू गोविंद यांनी हे सर्व बदलून टाकले. 'खंडेका पहल' असे त्या संस्काराला नाव दिले. खंड म्हणजे दुधारी कटचार. एका लोखंडी भांड्यात पाणी ओतायचे. त्यात बत्तासे टाकायचे. ते भांडे गुरूपुढे ठेवायचे. दुधारी कटचारीने ते पाणी ढवळत रहायचे. हे काम चालू असताना आदिग्रंथातील जपजी, आनंद, जप-साहेब इ. रचनेतील गाणी म्हणायची. त्या पाण्याला अमृत म्हणायचे. हे पाणी प्रत्येकाने पाचदा ओंजळीने प्राशन करायचे व शरीरावर शिंपडायचे. या संस्काराने एक नवी भावना गुरू गोविंदांनी निर्माण केली. खालसा पंथाची ५ बाह्य लक्षणेही ठरवली. त्याला पंचककार म्हणतात. डोक्याचे व दाढीचे केस, आखूड चड्डी म्हणजे कच्छ, कृपाण, कंगवा आणि पोलादी कडा या पाच गोष्टी धारण करायच्या. या पंथाचे पहिले जे पाच प्यारे झाले त्यांपैकी एक खत्री, एक जाट, एक परीट, एक न्हावी आणि एक कहार (पाणी वाहणारा) होता. अमृतदीक्षा घेतल्याबरोबर कायाकल्प होतो असे म्हणतात. उच्च-नीचभाव नाहीसा होतो. अशी अपेक्षा गुरूंनी बाळगली. या नव्या पंथात कोणीही श्रेष्ठ अगर कनिष्ठ नाही. सर्व सारखे आहेत असे गुरू गोविंदांनी सांगितले, 'बाहे गुरू का खालसा श्री बाहे गुरूजी की फत्ते' याचा तात्पर्यार्थ 'परमेश्वर म्हणजे पवित्र (खालसा); परमेश्वराचा जय असो.' पददलित, वंचित व उपेक्षित या सर्वांच्या जीवनात नवे वातावरण उत्पन्न झाले; नवे वळण मिळाले.

सर्व वर्णांचे लोक खालसा पंथात समाविष्ट होऊ शकतात. चातुर्वर्ण्य मानायचे नाही असे ठरले. सगळे बंधु–बंधू. सर्वांनी एकाच प्रकारची पूजा करायची. जेथे जेथे गुरुद्वारा म्हणजे ग्रंथसाहिबाचे मंदिर असेल, तेच तीर्थस्थान मानायचे. एकाच पंगतीत भोजन करायचे. अमली पदार्थांचे सेवन करायचे नाही. हलाल म्हणजे मुसलमानी पद्धतीने मारलेल्या जनावराच्या मांसाचा आहार करावयाचा नाही. सकाळी पाच स्तोत्रे नित्य म्हणावयाची. आपल्या हातून पाप वा अपकृत्य झाल्यास संगतमध्ये म्हणजे शिखांच्या सभेत क्षमा मागायची. प्राप्तीचा दहावा हिस्सा दानधर्मात खर्च करायचा. स्त्रियांनी पडदा पद्धती पाळायची नाही. गुरू गोविंदांनी शिखांसाठी एक आचारसंहिता तयार केली. तिला ‘ रहेतनामा ’ म्हणतात. धर्मश्रद्धेला राष्ट्रीयतेचे म्हणजे राजकीय स्वरूप या पंथाने दिले. तलवार बाळगणे व चालवणे हे प्रार्थनेइतकेच महत्त्वाचे ठरले. आपल्याला कसे मरण यावे यासंबंधी गुरू लिहितात– ‘ हे अकाल पुरुषा (हे शाश्वत परमेश्वरा), जेव्हा माझा अंतकाळ जवळ येईल त्यावेळी रणक्षेत्रावर वीरोचित मरण मला दे.’

या खालसा दलाच्या निर्मितीचा संस्कार ज्या महासभेत झाला त्यात ऐंशी हजार लोक हजर होते. तरुण दमदार लोक या खालसा दलास येऊन मिळू लागले. मोगल बादशाहांशी सुरू असलेल्या संघर्षात अनेक लढाया गुरूंना लढाव्या लागल्या. पाच वेळा गुरूंच्या आनंदपुरावर मोगल लष्कराची आक्रमणे झाली. १७०४ च्या शरद ऋतूत आनंदपूरला शत्रूचा पक्का वेढा पडला. औरंगजेबांच्या हुकमाप्रमाणे सरहिंदचा सुभेदार वजीर खान याने खालसा पंथ खलास करण्याचीच जय्यत तयारी केली होती. आनंदपूरला वेढा दीर्घकाळ राहिला. या वेढ्यात थकल्यावर वजीर खानने गुरूंशी तहाची बोलणी सुरू केली आणि आनंदपूर सोडताना गुरूंच्या सुरक्षेची हमी दिली. गुरूंनी पहिल्यांदा स्त्रिया आणि आपले दोन लहान मुलगे यांना सुरक्षित रीतीने बाहेर पाठविले आणि स्वतःच्या नियंत्रणाखाली स्वतःचे दोन मोठे मुलगे आणि मोजके अनुयायी घेऊन ते किल्ल्याच्या बाहेर पडले. बाहेर पडल्याबरोबर झंजावाती

पाऊस सुरू झाला. सारसा नदी पुराने दुथडी वाहू लागली. वजीर खानचे लष्कर आणि गुरू गोविंदसिंघाचा गट थंडी, वारा आणि पाऊस यांच्या तडाख्यात सापडले. धाकटे दोन मुलगे व गुरूंच्या माता यांची त्या अंधाऱ्या रात्री चुकामूक झाली. सुभेदाराच्या हाती ते सापडले. या धाकट्या मुलांनी मुसलमान बनण्यास नकार दिला त्यामुळे २७ डिसेंबर १७०४ मध्ये त्या मुलांचा शत्रूने शिरच्छेद केला. वडील दोन मुलगे व स्वत: गुरू त्याचप्रमाणे त्यांचे ४० अनुयायी यांनी सारसा नदीच्या पुरातून तरून जाण्यास यश मिळविले. या पुरामध्ये गुरूंना अनेक ग्रंथ आणि स्वत:चा ग्रंथ पुरात गमवावा लागला. इतर संपत्तीही त्या पुराच्या तडाख्यातून वाचू शकली नाही. चमकौर येथील एका घराचा त्यांनी आश्रय घेतला. २२ डिसेंबर १७०४ ला शत्रूने त्या घराला वेढा घातला आणि त्यात गुरूंचे दोन्ही प्रिय पुत्र गमावले. त्याबरोबर ३२ जोडीदार खालसा सैनिकही गमावले. ५ जोडीदार व स्वत: गुरू बचावले. मुस्लिम साधूचा वेष घेऊन गुरू लांबच्या प्रवासाला निघाले.

चमकौरहून खडतर प्रवास करावा लागला. लपतछपत भूक आणि थकवा यांची पर्वा न करता हा प्रवास सुरू झाला. या प्रवासात त्यांना दीना येथे औरंगजेब बादशाहांचे पत्र मिळाले. त्यात म्हटले होते की, दक्षिणेतील माझ्या दरबारात तुम्ही जातीने हजर रहावे. त्या पत्राला पर्शियन भाषेत कविताबद्ध उत्तर गुरूंनी दिले. त्याला झफरनामा म्हणतात. विजयाची कविता असा त्याचा अर्थ. यामध्ये त्यांनी बादशाहांचे सगळे गुन्हे, दडपशाही आणि स्वत:च्या बाबतीत व वडिलांच्या बाबतीत औरंगजेबाने जे अन्याय केले त्यांचे वर्णन केले. शेवटी असे म्हटले की, सगळे उपाय थकल्यावर तलवार हाच न्याय्य आधार ठरतो.

गुरू गोविंदसिंघ हे काही काळ तलवंडी (दमदमासाहिब) येथे मुक्काम करून राहिले. आदिग्रंथामध्ये गुरू तेघबहादूर यांनी केलेल्या ११६ कविता आणि स्वत:चीही रचना भरीस टाकली; स्वत:चा ग्रंथ रचला, त्याला दशमग्रंथ म्हणतात. त्यांनी पुष्कळ ग्रंथ लिहिले

होते; पण ते सारसा नदीत तरून जात असताना वाहून गेले. गुरू अनेक भाषांत रचना करू शकत होते. ती रचना गुरुमुखीत त्यांनी लिहिली. पर्शियन, हिंदी, ब्रजभाषा, पंजाबी आणि अनेक पंजाबी बोलींमध्ये त्यांनी रचना केल्या आहेत.

दमदमासाहिब येथे औरंगजेबांना पाठवलेल्या पत्राचे उत्तर मिळाले. त्यात गुरूंना भेटीस बोलाविले व गुरूंना ज्या यातना सोसाव्या लागल्या त्याबाबत दिलगिरी प्रदर्शित केली होती. गुरूंच्या मनात वजीर खानाला त्याच्या कृत्याबद्दल योग्य धडा शिकवायचा होता. त्याचप्रमाणे औरंगजेब बादशाहांना मराठ्यांशी २२ वर्षे झुंज द्यावी लागली, त्याचाही महाराष्ट्रात येऊन अभ्यास करायचा होता. म्हणून औरंगजेबांचे निमंत्रण स्वीकारले. गुरूंनी महाराष्ट्राचा प्रवास सुरू केला. राजस्थानपर्यंत पोहोचले. तेथे वार्ता आली की, ३ मार्च १७०६ ला औरंगजेब बादशाहाचा अंत झाला. तेव्हा गुरू आग्रा शहराकडे वळले. औरंगजेबानंतर औरंगजेबांचा सर्वात वडील मुलगा, वय वर्षे ६५, काबूलहून दिल्लीला आला. बहादूरशाह हा किताब घेऊन दिल्लीच्या तख्तावर बसला. बहादूरशाहला गुरूंनी सांगितले की, वजीर खान हा अत्याचारी आहे. त्याला अत्याचारांबद्दल जबर शिक्षा दिली पाहिजे. बादशाहाने सांगितले की, दम धरा; सर्व काही होईल. बहादूरशहा दक्षिणेत जायला निघाले तेव्हा गुरू आपल्या साहिबदेवी या पत्नीसह, आपल्या खालसा सेनेच्या काही तुकड्या घेऊन बादशाहांबरोबर निघाले. बादशाहांना वजीर खानाच्या विरुद्ध पाऊल टाकणे जमणार नाही हे लक्षात येऊन बादशाहांना निराशेने सोडून नांदेडलाच राहण्यास गेले. लछमनदास बैरागी यांच्या आश्रमात राहिले. बंदा बहादूर हे लछमनदास बैरागी. यांना शिष्य करून बंदा बहादूर हे नाव दिले. १७०७ ऑगस्टमध्ये बंदा बहादूरच्या ठाण्यावर मुक्काम केला. बंदा बहादूरला वजीर खानाचा समाचार घेण्याकरता पंजाबला पाठवून दिले. वजीर खान इकडे गुरूंचा निकाल कसा करावा, यासंबंधी गुप्त कट रचीत होता. दोन धडधाकट पठाण गुरूंच्या सेवेकरता त्याने पाठवून दिले. गुरूंना एकटे गाठून

त्या पठाणांनी गुरूंच्या पाठीत १७०८ ऑगस्टमध्ये खंजीर भोसकले. प्रयत्न केले पण जखमा बऱ्या होईनात. हल्ला होऊन दोन महिने होऊन गेले. अंतकाळ जवळ आला आहे हे लक्षात घेऊन शिष्य-गणांना गुरूंनी बोलाविले; आणि आदेश दिला : यापुढे कोणीही मानवगुरू गुरुगादीवर येणार नाही. खालसा पंथाची जबाबदारी अकाल पुरुषावर म्हणजे परमेश्वरावर आहे. धार्मिक जीवन आणि आचारधर्म याबाबतीत शंका आली तर पवित्र आदिग्रंथाप्रमाणे निर्णय करावा. ऐहिक बाबतीत पंचायतींच्या पवित्र बैठकीत एक-मताने निर्णय होईल, तो मान्य करावा. शिखांची महासभा बोलावून त्या महासभेत जे पंच निवडले जातील त्यांची पंचायत महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय देईल. पंचप्यारे आहेत; त्यांच्यामध्ये माझे चैतन्य भरलेले आहे. त्यांचा सल्ला नेहमी घ्यावा. त्यांचा सल्ला म्हणजे गुरुमत होय. ते गुरुमत महासभेपुढे ठेवावे. महासभेने ते मान्य केल्यानंतर सर्व शिखांना ते गुरुमत बंधनकारक राहील. अशी ही शीख पंथाची लोकशाही गुरू गोविंदांनी निर्माण केली.

खालसा पंथ या देशाचे राज्य करील (राज करेगा खालसा !) असे भविष्य वर्तवून हिंदू ऋषी व संत यांच्याप्रमाणे समाधिस्थ होऊन ईश्वराचा दिव्य आदेश प्राप्त केला. सर्व बाजूंनी बंद कुटी तयार केली. त्या जागेत ताटी बांधून ठेवली; त्यात शिरले. येथे कोणीही आत यायचे नाही म्हणून आज्ञा दिली. ‘ वाह गुरुजी का खालसा वाह गुरुजी की फतेह ’ असा हात जोडून जयघोष करीत त्या बंद जागेच्या दाराला आतून कडी लावून बसले. आतून त्या कुटीला स्वतः आग लावली. ज्वाळा बाहेर पडल्या. जमलेला खालसांचा महासमाज ‘ सत् श्री अकाल ’ असा सतत दीर्घकाळ पुकारा करत परतला. ही घटना ६ ऑक्टोबर १७०८ मध्ये घडली.

हे ध्यानात ठेवले पाहिजे की, गुरू गोविंदांच्या अखेरच्या समाधीनंतर गुरूंच्या अपार निश्चयाने भारलेले ऐहिक नेतृत्व उभे राहिले. ते विजयी होऊ लागले. १२ मे १७१० ला वजीर खान संपला. सबंध सरहिंद प्रांत, सतलज आणि यमुना यांच्या दुआब-

मधला प्रदेश, खालसांनी पादाक्रांत केला. खालसांचे निरनिराळे गट राज्य करू लागले. स्वत:ची नाणी पाडू लागले. गुरू गोविंदांच्या नंतर ४० वर्षांच्या आत सबंध पंजाबवर शिखांची सत्ता स्थापन झाली. ती जवळजवळ एक शतकभर टिकली.

गुरू गोविंदांना मोगलांची गुलामगिरी पूर्णपणे तोडता आली नाही; कारण ते पन्नाशीच्या आतच निजधामाला गेले; परंतु ही गुलामगिरी तोडण्याकरता लागणारी समर्थ मने तयार केली. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचे प्रेम त्या मनांमध्ये भरले होते; अन्यायी सत्तेचे भय नष्ट झाले होते. जी राजकीय सत्ता नागरिकांना आपल्या विवेकबुद्धीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य देत नाही ती सत्ता नष्ट करण्याचे धैर्य दिले. शूर, नि:स्वार्थी, आत्मत्यागी, आनंदाने यातनांना, आपत्तींना तोंड देणारे खालसा सैनिक तयार केले. युद्धात सिंह आणि शांततेत गरीब गाय असे सैनिक गुरू गोविंदांनी तयार केले.

व्याख्यान २ रे

शिखांचा राजकीय इतिहास

व्याख्यान २ रे

शिखांचा राजकीय इतिहास

मोगल साम्राज्य भारतातल्या दोन महत्त्वाच्या जमातींनी खिळखिळे केले. सिंधू नदी आणि दिल्ली यांच्यामधल्या प्रदेशासह व सरहद्द प्रांत आणि जम्मू-काश्मीर धरून या सर्व प्रदेशावर गुरू गोविंदसिंघांच्या कालखंडात शिखांचा प्रभाव वाढत होता. गुरू गोविंदसिंघांनंतर रणजितसिंगांच्या उदयापर्यंत मोगलांशी आणि अफगाणिस्थानच्या आक्रमकांशी, दुराण्यांशी खालसा शिखांची दले लढत राहिली. १८०१ मध्ये म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी पंजाबचा महाराजा म्हणून रणजितसिंगाला राजपद प्राप्त झाले. सबंध भारताचा १७ वे १८ वे शतक मिळून दोन शतकांचा राजकीय इतिहास पाहिला, तर शीख किंवा मराठे दिल्लीच्या सिंहासनावर आरूढ झाले असते; कारण मोगली सत्ता ही स्वतःच्या हीन कर्मांनी डबघाईस आली होती. परंतु अखेरीस ब्रिटिशांनी मोगलांच्या बादशाहीचा अंत केला. रणजितसिंगाच्या राज्यात सुमारे १५ % शीख, १५ % हिंदू आणि ६० % मुसलमान प्रजाजन होते. त्याने सर्व धर्मीयांना धार्मिक स्वातंत्र्य दिले. गुरू नानकदेवांचे अवतारकार्य हे सर्वधर्मसमभावीच होते. ‘ हिंदूओंका गुरू और मुसलमानोंका पीर ’ अशा तऱ्हेने इतिहासामध्ये अलौकिक उच्च स्थान नानकदेवांना प्राप्त झाले होते. अकबर बादशाहांची कारकीर्द हा अपवाद सोडल्यास हिंदू आणि शीख यांच्यावर अत्याचार, जबरदस्तीनें बाटवाबाटवी, हिंदूंच्या स्त्रिया आणि संपत्ती यांचा बेकायदेशीर अपहार, देवळे पाडणे, अपमानास्पद रीतीने हिंदूंना व शिखांना वाकविणे यामध्येच मुसलमानी राजवटीला परमार्थ साधला असे वाटे. शिखांच्याही इतिहासामध्ये मुसलमानांचा बदला किंवा सूड त्यांच्याच पद्धतीने शिखांनी कित्ये-

कदा घेतलेला आढळतो. शिखांनीसुद्धा मुसलमानांना जबरदस्तीने हिंदू करून घेण्याचा अनेक वेळा सपाटा लावला होता; परंतु राजसत्ता स्थापन झाल्यावर शीख हे सर्वधर्मसहिष्णूच बनले. यांचे आदर्श उदाहरण म्हणजे महाराजा रणजितसिंगांची राजवट होय.

वजीर खानने गुरू गोविंदसिंघांची मुले हालहाल करून अकारण मारली. म्हणून वजीर खानाला दिल्लीच्या बादशाहाने जबर शिक्षा द्यावी म्हणून गुरू गोविंदसिंघांनी मोगल बादशाहांची मनधरणी केली. ती विफल झाली हे पाहून वजीर खानाचे पारिपत्य करण्याकरता गुरूंनी शूर शिष्यांची निवड करण्याचे ठरवले. गुरूंना पंजाबमधली जमीनदारी पद्धती नष्ट करावयाची होती. भूमिहीन श्रमिक शेतकऱ्यांमध्ये जमीन वाटून द्यायची होती. म्हणून निवडक शूर शिष्यांना वजीर खानाचे पारिपत्य करण्याचा व शेतकऱ्यांचे बंड उभारण्याचा आदेश दिला. नांदेड येथे अनेक जुने आणि विश्वासू शिष्य बरोबर होते; परंतु त्यांच्यामध्ये अगदी नवखा असा आणि थोड्याच आठवड्यांमध्ये परिचित झालेला शिष्य त्यांनी येथे निवडला. गोदावरीच्या तीरावर बैरागी बनून तपश्चर्या करीत बसलेला लछमनदास (१६७०–१७१६) ज्याला पुढे माधवदास म्हणू लागले, त्याला पंजाबला पाठवण्याचे ठरले. गुरूंचे जीवितकार्य त्याला माहीत होते. लछमनदासाच्या डोळ्यांमध्ये तपश्चर्येच्या तेजाबरोबरच चेतलेली अग्नीची ज्वाला गुरूंना दिसली. लछमनदासाला आज्ञा केली की, पंजाबमध्ये जा. तेथे शिखांचा छळ होत आहे. छळणाऱ्यांना पुरी अद्दल घडव आणि माझ्या प्रिय पुत्रांचा नाहक खून ज्यांनी केला, त्यांचा सूड उगव. लछमनदास स्वतःला गुरूंचा 'बंदा' म्हणजे दास म्हणवून घेत असे. त्यामुळे इतिहासात बंदा बैरागी म्हणून त्याचा निर्देश येतो. त्याने अनेक लढाया केल्या; त्यात तो विलक्षण शौर्याने चमकला म्हणून पुढे त्याला बंदा बहादूर म्हणू लागले.

बंदाने नांदेड सोडले. दिल्लीच्या जवळ येऊन पोहोचला. बहादूरशाह बादशाहा दक्षिणेतच होता, भावाला धरून आणण्या-

करता. त्यावेळेस मौका पाहून रजपूत राजे बंड करून उठले होते. दिल्लीपासून ३५ मैलांवर बंदाने गुरूंचा झेंडा उभारला आणि महत्त्वाच्या शिखांकडे बंदाला मदत करण्याबद्दल गुरूंनी लिहिलेली वैयक्तिक पत्रे पाठवून दिली. लगेच बातमी आली की, गुरूंवर प्राणान्तिक हल्ला झाला आहे.

गुरूंनी बंदाला केवळ सेनापती या नात्यानेच कामगिरी बजावायला पाठविले होते. परंतु हासुद्धा धार्मिक पुरुष व श्रेष्ठ संत आहे, म्हणून त्याची ख्याती जनतेत पसरू लागली. पुरुष त्याच्या सैन्यात दाखल होऊ लागले आणि स्त्रिया आपल्या कुटुंबकल्याणार्थ त्याला प्रणाम करून आशीर्वाद मागू लागल्या. त्याच्या पायापुढे ज्या देणग्या येत, त्या सगळ्या तो देऊन टाकी. बंदाने जाहीरनामा काढला :– "ज्यांना ज्यांना मुसलमान छळत असतील, जमीनदार शेतकऱ्यांना पिळत असतील, चोर–दरोडेखोर–वाटमार करणारे असे कुणी असतील, त्यांच्यापासून प्रजेचे रक्षण करण्यात येईल." या जाहीरनाम्याने अगोदरच अस्वस्थ असलेल्या प्रजेमध्ये आग पसरवली. मालवा प्रदेशातील शेतकरी, जमीनदारांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध उठले.

दिल्ली–परिसर सोडून बंदाची स्वारी उत्तरेकडे निघाली. सोनपतमध्ये गेल्यावर तिथला खजिना लुटला. लुटलेली संपत्ती आपल्या सेनेत वाटून टाकली. एक तुकडी कैथलकडे आणि दुसरी समनाकडे पाठविली. कैथलचा पाडाव त्वरित झाला. समना शहर जिंकायला लढाई द्यावी लागली. तीन दिवस लढाई झाली. शहराच्या रस्त्यांवर प्रेतांचा खच पडला. समना पडले. या शहरातच नववे गुरू तेगबहादूर यांचा खून करणारे राहत होते. आणि गुरू गोविंदांचे दोन मुलगे याच लोकांनी मारले होते. स्वतः बंदाने मालवामधून अनेक शहरे घुरम, शाहबाद, मुस्ताफाबाद, कपुरी आणि साढौरा लुटली आणि सरहिंदला आला. हिवाळा सुरू झाला. सैनिकांना शिक्षण देत आणि शस्त्रास्त्रांचा साठा करीत हिवाळा घालविला. भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन देण्याची प्रतिज्ञा केली होती आणि लुटीत

जे मिळेल तेही वाटून टाकायचे हेही ठरले होते. त्यामुळे सैनिकांचा तुटवडा पडला नाही. वजीर खान आणि दिवाण सूचानंद हे सरहिंदचे रहिवासी होते. शहराच्या जवळच मोठी लढाई झाली. वजीर खान मारला गेला. त्याचे सैन्य गलितधैर्य झाले. बंदा सरहिंदमध्ये २४ मे १७१० ला शिरला. वजीर खान मारला गेला; परंतु गुरू गोविंदांचे मुलगे ज्याने प्रत्यक्ष मारले तो सूचानंद दिवाण मात्र हाती लागला; वजीर खानाने हे मुलगे सूचानंदाकडे सोपविले होते. सरहिंद त्वरित हाती पडले याचे कारण सहज अनुमानता येते. वजीर खान गरीब लोकांची विलक्षण पिळवणूक करीत असे. तो फार क्रूर होता. वजीर खानाच्या महालातली आणि सूचानंदाच्या खजिन्यातली प्रचंड संपत्ती बंदाला लुटता आली. यमुना आणि सतलज यांच्यामधला प्रदेश बंदा बैराग्याच्या हाती पडला. त्याने स्वतःचे नाणे काढले. त्या नाण्यावर गुरू नानक व गोविंद यांची नावे उमटविली. शीख पंथाच्या आचारधर्माची दोन चिन्हे उमटविली; एक- डेघ म्हणजे कढई आणि तेघ म्हणजे तलवार. एका पंगतीत जेवायचे याची सूचक कढई आणि धर्मरक्षणार्थ तलवार धारण करायची. अशा प्रकारे विजय मिळू लागल्यामुळे उत्तरेतली मोगलांची सत्ता नष्ट करण्याची हीच संधी आहे, ही गोष्ट बंदा बहादुरांच्या लक्षात आली. यमुना-गंगा यांच्या दुआबामध्ये शहरापाठीमागून शहरे काबीज करत आणि लुटत जलालाबादेपर्यंत ही शीख सेना पोहोचली. ही बंदाची सेना नंतर पंजाबमध्ये परत फिरली. जलंदर आणि होशियारपूर काबीज करून १७१० मध्ये जलंदर दुआब मुक्त केला. पंजाबमधील शेतकरी समाज बंदाच्या किसान सेनेचा जागोजागी सत्कार करीत होता; कारण जमीनदारशाहीच्या नाशाने तो उत्साहित झाला होता.

बंदा बहादुरच्या या बंडाची वार्ता बहादूरशहांपर्यंत पोहोचली आणि रजपुतांचा बंदोबस्त करण्याचे सोडून देऊन ते घाईघाईने दिल्लीला परतले. थोडा वेळ बादशहांनी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि औध येथील लष्कराच्या तुकड्या एकत्रित केल्या. शिखांविरुद्ध हे

धर्मयुद्ध (जिहाद) आहे म्हणून तरुण मुसलमानांनी या युद्धाच्या सैनिकांत दाखल व्हावे, असे फर्मान काढले व फिरोजखानची सेनापती म्हणून नेमणूक केली. बंदाच्या किसान सेनेनें मालवा प्रदेश ताब्यात ठेवला होता. तो मोगल लष्कराने परत मिळवला. ह्या वेळेस मुखलिसगढनामक डोंगरी किल्ल्यामध्ये बंदा बहादूर राहिला होता. त्या किल्ल्याला मोगली लष्कराने वेढा दिला. बंदा आपल्या काही सहकाऱ्यांसह त्या वेढ्यातून एका रात्री निसटला. अशा रीतीने मोगल बादशाहा आणि त्यांचे लष्कर बंदाचा पाठलाग करीत राहिले. एकदा बंदाची सरशी व्हायची तर एकदा मोगली लष्कराची. असा हा संग्राम अनेक वर्षे चालू राहिला. बंदा मधूनमधून पंजाबच्या डोंगराळ भागामध्ये विश्रांतीकरता काही काळ जाऊन राहत असे व पुन्हा परत हल्ले करून मोगल सैन्याला सतावत असे. अखेरीस १७१५ फेब्रुवारीत बंदा मैदानी प्रदेशात सेनेसह उतरला आणि बटाला या खेड्यामध्ये ठामपणे लढाईस तोंड देण्याकरता सज्ज झाला. त्याकरता तटबंदी सुरू केली, परंतु तटबंदी पुरी होण्याच्या अगोदरच अब्दुस समदखानच्या नेतृत्वाखाली प्रचंड बादशाही फौजेने हल्ला केला. एवढ्या प्रचंड फौजेला बंदा सारखा मार देत राहिला आणि निसटला. गुरुदासपूर या शहराला जाऊन पोहोचला. बादशाही फौज पाठलाग करीत होतीच. गुरुदासपूरजवळ असलेला एक पाटबंधारा बंदाने फोडला आणि शहराभोवती पाण्याचा खोल तलाव निर्माण केला. सगळीकडे पाणी पसरत होते. अब्दुस समदखानाने आपल्या फौजेचा त्या जलमय प्रदेशाभोवती गराडा दिला. शांत रीतीने दीर्घकाळ पाणी उतरून जाण्याची वाट पाहिली. बंदाची अन्नसामग्री घटू लागली. इकडे अब्दुस समदखानाने त्या सरोवराभोवती प्रचंड भिंत बांधली. त्या भिंतीवर चढून मांजर किंवा कुत्रे बाहेर आले तरी तेदेखील बादशाही सैन्य मारून टाकी; कारण त्यांची समजूत अशी होती की, बंदा हा अद्भुत शक्ती असल्यामुळे कोणत्याही प्राण्याचे रूप घेऊन बाहेर पडू शकतो. बंदाचे सैन्य अडकून पडलेले; खायला मिळेना.

म्हणून घोडे व उंट यांचे आणि निषिद्ध असलेले बैलाचे मांसही खाऊ लागले. ८ महिने हा वेढा पडला होता. अब्दुस समदखानदेखील वेढा देऊन दमला होता. त्याने बंदाला आश्वासन दिले की, तुला बादशाहा माफी करतील. बंदा आणि त्याचे सहायक पकडले गेले. सगळ्यांच्या पायांत व हातांत बेड्या पडल्या. दिल्लीला नेण्यात आले आणि वाटेमध्ये कोणत्याही गावात, रस्त्यात शीख सापडला की, शिरच्छेद करून त्याची वाट लावायचे. १७१६ फेब्रुवारीला बंदा आणि त्याचे सहायक व कुटुंबीय यांची दिल्ली शहरात धिंड काढली आणि त्यांना हालहाल करून ठार केले. बंदाच्या लढायांनी मुसलमानांतील वरिष्ठ वर्ग, श्रीमंत जमीनदार, व्यापारी हे सगळे शिखांचा द्वेष करू लागले. शिखांचे शत्रू बनले.

गुरू गोविंद यांनी नांगराच्या तलवारी केल्या. तलवारींचा उपयोग बंदाने केला. गुरू गोविंद यांनी तत्त्वे सांगितली; बंदाने ती अमलात आणली. गुरू गोविंद यांनी मोगल अंमलाबद्दल आदर व भीती नष्ट केली, तर बंदाने मोगल अजिंक्य आहेत हे खोटे ठरवले. गुरूंवर बंदाची पूर्ण श्रद्धा होती. वैयक्तिक जीवनात तो श्रेष्ठ चारित्र्याचा होता. त्याचे ऐतिहासिक महत्त्व आता कुणी अमान्य करीत नाही. शिखांच्या इतिहासातील त्याचे स्थान मोठे आहे असेच केवळ नसून भारताच्या इतिहासातही त्याचे स्थान विसरून चालणार नाही.

शीख पंथ हा हिंदू धर्माचे रक्षण करणारा पंथ आहे; हे या काळात मनात बिंबल्यामुळे हिंदू आणि शीख पंजाबमध्ये एकमेकांना मदत करीत असत. या काळात हिंदू कुटुंबातील एकतरी मुलगा शीख धर्माला वाहण्यात येत असे. कोणा हिंदू बाईला विचारले, तर तुला किती मुलगे आहेत ? तर ती उत्तर देईल की, चार आहेत व एकच शीख आहे.

बंदा बहादूरच्या मृत्यूनंतर शिखांवर जुलूम–जबरदस्ती व वारंवार हल्ले होऊ लागले. त्यामुळे खालसा सेनेने वनवासात दिवस काढण्यास सुरुवात केली. तीन वर्षांत परिस्थिती बदलली. वनवासात असलेले शीख पुन्हा पंजाबातील शहरांत व खेड्यांत परतले. १७२०

साली अमृतसर येथे वैशाखी आणि दिवाळी त्यांनी साजरी केली. त्यांनी गनिमी काव्याने मुसलमानी फौजांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. हल्ला करुन डोंगराळ मुलखात परतत; मोगल फौज शिखांचा पाठलाग करी; पण शीख कोणत्या दिशेने गेले हे कळत नसे. जनतेची सहानुभूती त्यांनी मिळवली होती. दिवसा ते दिसत नसत; रात्री अचानक छापा घालत. शिखांना शिपाईगिरीत धर्माचे संरक्षण आहे हे जसे दिसले तसेच पराक्रम, प्रतिष्ठा आणि चरितार्थाचे साधनही दिसले. त्यांचे निरनिराळे जथे झाले होते. त्या सर्वांचे मिळून खालसा दल बनले. या दलात बुढा दल आणि तरुण दल असे दोन प्रकार पडले. बुढा दल म्हणजे ज्यांनी गुरू गोविंदसिंघांच्या पराक्रमात भाग घेतला होता किंवा तो पराक्रम पाहिला ती मंडळी आणि तरुण दल म्हणजे गुरू गोविंदसिंघांच्या मृत्यूनंतर जी मंडळी उदयास आली त्यांचे दल.

१७३८ मध्ये दिवाळीचा उत्सव सुवर्णमंदिरात दरबारसाहेब-मध्ये सुरू असताना मोगल सुभेदार झकेरिया खान याने यात्रा गोळा झाल्याबरोबर जमलेल्या यात्रेवर हल्ला केला व यात्रा बंद पाडली. ही यात्रा भरविण्याची परवानगी या सुभेदाराने दिली होती. कारण त्या परवानगीमुळे १० हजार रुपयांची देणगी त्याला मिळणार होती. त्याप्रमाणे त्याने करार केला होता. हा करार त्याने भाई मानसिंग-पाशी केला होता. मानसिंगपाशी सुभेदाराने १० हजार रुपयांची मागणी केली. करार पुरा न केल्यामुळे मानसिंगने ती नाकारली; तेव्हा त्याला पकडण्यात आले. मृत्यू अगर मुसलमान होणे असा विकल्प त्याच्यापुढे ठेवण्यात आला. अर्थात त्याने मृत्यू पत्करला. एकेक अवयव तोडून त्याला ठार मारण्यात आले. त्याच्या अनेक सह-काऱ्यांनी तोच मृत्यूचा मार्ग पत्करला; परंतु धर्म बदलला नाही.

भाई मानसिंग यांच्या बलिदानानंतर थोड्याच महिन्यांनी अफगाणिस्थानच्या नादिर शाहाने दिल्लीवर स्वारी केली. नादिर शाहाने पंजाबातून दिल्लीकडे कूच केले. तेथे हजारो लोकांची कत्तल करून, प्रचंड लूट घेऊन, अनेक स्त्रिया व पुरुष यांना गुलाम करून

तो अफगाणिस्थानकडे परतला. या संधीचा फायदा घेऊन शिखांच्या टोळ्यांनी हल्ला करून बरीचशी लूटमार केली. हे कोण दाढीवाले जंगली लोक आहेत, हे नादिर शाहाने विचारल्यावर, ते शिखपंथी आहेत असे त्याला समजले. तेव्हा नादिर शाहा म्हणाला, या लोकांचे धैर्य अपार आहे. हे लवकरच देशाचा ताबा घेतील. त्याने एका सरदारास त्यांचा पाठलाग करून त्यांची घरेदारे उद्ध्वस्त करण्याचा आदेश दिला. त्या सरदाराने उत्तर दिले, त्यांचे घर म्हणजे त्यांचे घोड्यावरील खोगीर आहे. १७३९ साली पंजाबमध्ये अशी स्थिती होती की, मध्यवर्ती सरकार कृतिशून्य झाले होते. मोगल सरदार झकेरिया खान शिखांचा बंदोबस्त करू लागला. एकही शीख ठेवायचा नाही, दिसेल तो कापायचा असे धोरण आखले. परंतु शिखांचे संघटन मोडले नाही; जिद्द कायम राहिली. त्यांचे गनिमी काव्याचे युद्ध अधिक पेटले. १७४५ मध्ये सुभेदार झकेरिया खान मृत्यू पावला. झकेरिया खानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा याह्याखान सुभेदार झाला. त्याने बापापासून शौर्यापेक्षा क्रौर्याचाच वारसा अधिक मिळवला होता. दिवाण लखपतराय लाहोरच्या अधिकाऱ्याचा फडणीस व मुख्य अधिकारी होता. त्याने प्रतिज्ञा केली की, मी शिखांना निःशेष केल्याशिवाय राहणार नाही. नबाब याह्याखान याने त्याला संपूर्ण अधिकार दिले. त्याने हजारो शिखांना कंठस्नान घातले. याह्याखानाच्या घरामध्ये भाऊबंदकी सुरू झाली. त्याचा फायदा शिखांना मिळाला.

यानंतर अफगाणिस्थानातील अहमदशहा अबदालीच्या भारतावर ९ वेळा स्वाऱ्या झाल्या. त्यामुळे दिल्लीच्या मोगल पातशाहीचा पंजाबवरील कबजा जवळजवळ समाप्त झाला. अहमदशहा अबदालीचा आणि मराठ्यांचा पानिपत येथे जो १४ जानेवारी १७६१ रोजी संग्राम झाला त्यात मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला. मराठी दौलत पानिपतच्या धक्क्याने हादरली; परंतु थोड्याच काळात सावरली गेली. मराठ्यांचा रणांगणावर जरी पराभव झाला, तरी मराठ्यांच्या भीतीने अफगाणवाल्यांनी पुन्हा दिल्ली गाठली नाही.

पंजाबवर त्यांनी वारंवार अंमल बसवण्याचा प्रयत्न केला; परंतु राज्य सुस्थिर व संघटित राहू शकले नाही. अहमदशहा काबूलकडे निघाला तेव्हा खालसा दलाच्या तुकड्यांनी पुनःपुन्हा हल्ले करून लुटीचा मोठा भाग काबीज केला. शीख इतिहासकार सांगतात की, सुमारे २० हजार हिंदू स्त्रियांना अहमदशहाच्या बेइज्जतीतून शिखांनी सोडविले व दक्षिणेस धाडले. अमृतसरमार्गे अब्दाली परतत होता तेव्हा त्याने सुवर्णमंदिर पाडले, सरोवराच्या आसपासच्या इमारती पाडून शहरातील घाण आणून ते सरोवर भरून काढले, शिखांची कत्तल केली. १७६२ च्या दिवाळीत सुमारे ६० हजार शीख लोक अमृतसर येथे जमले. अहमदशहा अब्दालीचा सूड उगवण्याकरता अकालतख्तापुढे जाहीरपणे निश्चय केला. अहमदशहा अब्दालीने जिंकलेला सगळा मुलूख शिखांनी काबीज केला. अब्दालीने पंजाब सोडले व अवघ्या ८ दिवसांच्या आत डोंगराळ भागातून खालसा दल परतले. लाहोर जिंकले. अमृतसर येथे वैशाखी साजरी केली. १७६६ मध्ये पुन्हा अहमदशहा हिंदुस्थानवर चाल करून आला; परंतु त्याला जय मिळाला नाही. १७६१-६६ पर्यंतच्या अफगाण व शीख यांच्यात झालेल्या युद्धाने शीख सत्ता प्रबल ठरली. एकंदर पंजाबमध्ये १७६८ मध्ये शिखांच्या एकंदर १२ संघटना अस्तित्वात आल्या. त्यांना प्रत्येकी निरनिराळी नावे होती. त्या २० वर्षांच्या काळात मोडल्या जात आणि पुन्हा जुळल्या जात. या संघटनांना 'मिसाल' (मिस्ल) असे म्हणत. पंजाबचे निरनिराळे विभाग किंवा प्रदेश या १२ सेनादलांनी सत्तेखाली आणले. अरबी भाषेत मिस्ल याचा अर्थ सारखा वा समान असा आहे. या मिस्लचे म्हणजे जथाचे सभासद राजकीय, धार्मिक व सामाजिक दृष्ट्या समान मानलेले असत. १७६८ पासून १७९८ पर्यंत पंजाब प्रदेशावर या मिस्लांचा ताबा होता व प्रत्येक मिस्ल आपल्या क्षेत्रात स्वतंत्र होते. इतिहासकार इबट्सन म्हणतो की, धर्मसत्ता, लोकसत्ता आणि हुकूमशाही यांचे हे मिश्रण होय. त्यांच्यामध्ये सुसंवाद राखण्याचे काम अकालतख्ता-पुढील दर २ वर्षांनी भरणारी शिखांची महासभा करीत असे.

शुकर जाकिया मिसालचा संस्थापक चरणसिंग याचा रणजितसिंग हा नातू. याने १७ वे वर्ष लागताच १७९७ मध्ये राज्याचा कारभार हाती घेतला. त्याच्या घरामध्ये आई, सासू आणि दिवाण यांच्यात कारस्थाने सुरू होती. या त्रिकूटाचे चाळे तोडल्यानंतर रणजितसिंगाने आपल्या वडिलांचे मामा दलसिंग यांना मुख्य प्रधान नेमले. घरामध्ये स्वैरवर्तनी आई व दिवाण आणि इतर मंडळी होती. त्याला शिवाजी महाराजांप्रमाणे दादोजी कोंडदेव यांच्यासारखा शिक्षक आणि जिजाईमातेप्रमाणे चारित्र्यसंपन्न माता मिळाली नाही. केवळ जन्मसिद्ध विवेकबुद्धी असल्यामुळे तो सद्वर्तनी आणि पराक्रमी झाला.

१७९७ मध्ये रणजितसिंगाने सत्ता हाती घेतली, त्या वेळी मिसालदारांमध्ये मोठा सरदार अशी त्याची स्थिती नव्हती. ताब्यातील प्रदेशही फारसा मोठा नव्हता. त्या वेळी सर्वांत अधिक महत्त्वाची मिसाल म्हणजे भांगी मिसाल ही होती. तिच्या ताब्यात लाहोर, अमृतसर, गुजरात व सियालकोट यांतील बहुतेक प्रदेश होता. अफगाणचा राजा झमनशहा याने वारंवार स्वाऱ्या केल्याने भांगी मिसाल दुर्बळ झाली होती. कनईया मिसालशी रणजितसिंगाच्या कुळाचा लग्नाने संबंध आल्यामुळे त्या मिसालची प्रमुख सदा कौर ही रणजितसिंगाची सासू राजकीय सल्लामसलतीकरता उपयोगी पडू लागली. सत्तेच्या पायऱ्या तो झपाट्याने चढू शकला. बहुतेक मिसालदार स्वस्थ होते. त्यांच्या मनात फारशी महत्त्वाकांक्षा नव्हती. १७९४ मध्ये नेपाळच्या गुरखा सत्ताधाऱ्यांनी गढवाल व कुमाऊन या भागाचा ताबा घेतला होता. त्यांचा सरदार अमरसिंग थापा याला हिमालयातील सिमला भागामधील डोंगरी राजांना जिंकून पंजाबात उतरायचे होते. या परिस्थितीला रणजितसिंगाने तोंड दिले. मराठ्यांची तशी भीती नव्हती. मराठे पंजाबवर केवळ लूटमारीकरता हल्ला करत; त्यांना राज्य करावयाचे नव्हते. ब्रिटिश सत्ता दिल्लीपासून त्या वेळी दूर होती. नेपोलिअन हिंदुस्थानवर स्वारी करील

अशी भीती ब्रिटिशांना वाटे. त्या दृष्टीने ब्रिटिशांनी धोरणे आखली व राजकीय हालचाली सुरू केल्या. ब्रिटिशांच्या योजनेप्रमाणे नेपोलिअनला अडथळा करणाऱ्या ४ तटबंदी होत्या; पर्शिया (इराण), अफगाणिस्थान, रणजितसिंग व सतलजच्या दक्षिणेकडील शीख राज्ये. १७९७ पासून १८०९ पर्यंत रणजितसिंगाने सतलजच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील सर्व पंजाबचा मुलूख आपल्या ताब्यात आणला. पंजाब आपल्या छत्राखाली आणण्याच्या दृष्टीने येथील अफगाण व पठाण सरदारांना त्यांनी पराभूत केले. अफगाण हे स्वतःला पंजाबचे मालक म्हणत व साहजिकच त्यांचा विरोध होणे अटळ होते. १७५२ मध्ये अहमदशहा अब्दालीने अफगाण राज्याचा पंजाब हा एक भाग करून टाकला होता. अहमदशहा, त्याचा मुलगा तिमूर आणि त्यानंतर शहाझमान हे अफगाणचे क्रमाने राजे झाले. शहाझमानाला पंजाबवर दोनदा स्वारी करावी लागली. १७९७ मध्ये त्याने लाहोरचा कबजा घेतला. दिल्लीवर तो हल्ला करणार तोच त्याला काबूलला परतावे लागले. १७९८ मध्ये शहाझमान हिंदुस्थानात आला त्या वेळी रणजितसिंग आणि शहाझमान यांच्या सैन्यात चकमक उडाली. शहाझमानला काबूलहून वार्ता आली की, त्याचा सावत्र भाऊ मुहंमद बंड करून उठला आहे. त्यामुळे शहाझमानला परतावे लागले. वाटेत झेलमला पूर आला होता. त्याच्या साऱ्या तोफा पुरात सापडल्या. रणजितसिंगाने त्या पुरातून काढून शहाझमानाला बक्षीस दिल्या. तो खूश झाला. लाहोरचे शासन अफगाण राजाच्या द्वारे करावे असे सुचविले. विशेष लढा न देता लाहोर त्याच्या ताब्यात आले. लाहोरचा ताबा मिळताच रणजितसिंगाने फर्मान काढले की, "सैन्याने नागरिकांना कुठल्याही प्रकारे त्रास देऊ नये, लूटमार करू नये, सर्वांना संरक्षण मिळेल, व्यापाराला उत्तेजन मिळेल." कसबी आणि हुन्नरी माणसांना आपला धंदा सुरू करण्यास अनुकूल वातावरण उत्पन्न केले, राज्याची नाणी पाडली; आपले नाव त्यावर पाडले नाही. नाण्यांना 'नानकशाही' म्हणत व स्वतःच्या मुद्रेवर 'अकालशाही' असे शब्द

त्याने ठेवले होते. थोड्याच वेळात लाहोरात शांततेचे वातावरण निर्माण झाले. रणजितसिंगाला हिंदू व मुसलमान लोक मुक्तिदाता म्हणू लागले. लाहोरचा कबजा रणजितसिंगाला मिळाल्याने पंजाबातील इतर शीख व मुसलमान सरदार गलितधैर्य झाले. तरी त्यांनी एकजूट करून रणजितसिंगाचा पराभव करण्याचा प्रयत्न केला. लाहोरपासून सुमारे १२ मैलांवर बसीम या गावी दोन्ही सैन्ये एकमेकांना भिडली. रणजितसिंगाच्या शत्रुदलात अगोदरच फाटाफूट होती. ही दोन्ही सैन्ये दोन महिनेपर्यंत एकमेकांना पाहत होती. लहान लहान चकमकी मधूनमधून होत; परंतु मोठी लढाई झाली नाही. बसीमच्या लढाईनंतर रणजितसिंगाने आपले धोरण बदलले. दुर्बल सरदारांना नेस्तनाबूत केले. प्रबळ होते त्यांना चातुर्याने वागवून त्यांच्याशी मैत्री केली. पंजाब प्रदेशातील दोन मुख्य शहरे लाहोर व अमृतसर होत. लाहोर हे राजकीय दृष्टया महत्त्वाचे व राजधानीचे शहर व अमृतसर हे शीख धर्माची राजधानी होती. ही दोन्ही शहरे कबजात आल्यामुळे रणजितसिंगाची प्रतिष्ठा एकदम उंचावली.त्याचे एक स्वतंत्र राज्य निर्माण झाले. त्याची महत्त्वाकांक्षा सारा पंजाब एका राज्यात एका निशाणाखाली आणावयाचा ही होती. त्याप्रमाणे पहिली १० वर्षे त्याने आपल्या या बाबतीतील योजना बऱ्याच प्रमाणात यशस्वी रीतीने पार पाडल्या. शीख मिसालदार सूक्तासूक्त रीतीने त्याने निकालात काढले.

लाहोर हा मध्यबिंदू कल्पून चारी दिशांना असणारा मुलूख ताब्यात आणण्याचे शिस्तवार प्रयत्न रणजितसिंगाने केले व तो यशस्वी झाला. रणजितसिंग याने मुलतानवर पहिली स्वारी केली; परंतु तेथील नबाब मुझफरखान याने रणजितसिंगाला खंडणी देऊन परत लावले. अशा ३ स्वाऱ्या त्याने मुलतानवर केल्या. चौथ्या स्वारीत दोन महिने युद्ध चालले; पण किल्ला ताब्यात आला नाही. नबाबाने खंडणी दिली आणि रणजितसिंगाला परतविले. १ जून १८१८ रोजी मुलतानचा किल्ला रणजितसिंगाच्या ताब्यात आला. खूप मोठी लूट मिळाली. मुलतानच्या युद्धातील सेनापती दिवाण-

चंदला त्याने खूप देणग्या दिल्या. काश्मीर येथील हवापाणी व सौंदर्यपूर्ण प्रदेश प्रत्येक महत्त्वाकांक्षी सत्ताधीशाला आकर्षित करी. तिकडे त्याने दृष्टी वळविली.

१८११ मध्ये रणजितसिंगाने भिवार व राजौरी हा नैर्ऋत्य दिशेकडील प्रदेश हल्ला करून ताब्यात घेतला. रणजितसिंगाने आपली पराक्रमाची नौबत सिंधूच्या पलीकडील भागात ऐकू जावी म्हणून अटकवर हल्ला केला. हिंदुस्थानात अफगाणिस्थानातून येण्यास अटक हे प्रवेशद्वार होते. अटक मिळाल्याने पंजाबातील वायव्य भागात शीख वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यानंतर काश्मीरकडे दृष्टी वळवली. ४ जुलै १८१९ रोजी श्रीनगर ताब्यात आले. जिंकलेल्या प्रदेशाच्या संरक्षणार्थ पेशावर घेणे आवश्यक वाटले. १८१८ मध्ये काबूलमध्ये अराजक व यादवी सुरू झाली. त्यामुळे हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर गडबड उडाली. शीख सैन्य पेशावरमध्ये शिरले. ते सैन्य ४ दिवस तेथे राहिले. पेशावर घेतल्यास नव्या कटकटी उभ्या राहतील म्हणून नजराणे घेऊन रणजितसिंग परतला.

रणजितसिंगाच्या कानावर ब्रिटिशांच्या राज्यविस्ताराच्या बातम्या वारंवार येत होत्या. लहानपणी त्याला देवी आल्यामुळे त्याचा एक डोळा निरुपयोगी झाला होता. एकाच डोळ्याने त्याला दिसत होते. त्याने हिंदुस्थानचा नकाशा मागवला आणि नकाशा ज्याने दाखवला, त्याला विचारले की, हे लाल काय आहे ? तो म्हणाला; इंग्रजी सत्ता ! कलकत्त्यापासून दिल्लीपर्यंत आणि कन्याकुमारीपासून दिल्लीपर्यंत सगळा नकाशा लाल दिसला. लगेच रणजितसिंग म्हणाला, सब हिंदुस्थान लाल हो जाएगा ! रणजितसिंगाने ब्रिटिश सैन्याच्या रचनेबद्दल व तोफा आणि हत्यारे यांच्या निर्मितीबद्दल इत्थंभूत माहिती मिळवून घेतली. लुधियानाच्या इंग्रजी दवाखान्यात शिक्षणासाठी विशेषतः इंग्रजी शिक्षणासाठी तरुण मुले पाठवली. १८३७ च्या मार्च महिन्यात आपला नातू नवनिहालसिंग याचे लग्न मोठ्या थाटात केले. त्यात इंग्रज सेनापती सर हेन्री फेन हा हजर होता. त्यानंतर

इंग्रजांशी आपले संबंध सुधारावे असा प्रयत्न त्याने केला. अफगाण सिंहासन मिळवायचे स्वप्न रणजितसिंग बाळगत होता. त्यावेळच्या निरनिराळ्या हिंदू आणि मुसलमान राजवटींशी प्रतिनिधींच्या द्वारे इंग्रजांनी संबंध स्थापित केले. सत्तासमतोलाचे राजकारण इंग्रज खेळू लागले. इंग्रजांना वळविण्याची खटपट त्याच्या नातवाने सुरू केली, रणजितसिंग या वेळी (१८३९) आजारी होता. रणजितसिंगाच्या फौजेने १८३९ च्या एप्रिलमध्ये कंदाहार घेतल्याचे समजले, तेव्हा त्याला बरे वाटले. त्याला आशा वाटू लागली की, इंग्रजाचे डाव आपण त्यांच्यावर उलटवू. तथापि २७ जून १८३९ रोजी वयाच्या ५९ व्या वर्षी लाहोर येथे त्याचा देहान्त झाला. त्याच्या फौजेने काबूल व गझनी ही थोड्याच दिवसांत घेतली; तथापि हे पाहण्यास तो जिवंत राहिला नाही.

१८३६ मध्ये आंतरराष्ट्रीय परिस्थितीने इंग्रजांना रणजितसिंगविषयक आपला दृष्टिकोन बदलावा लागला. १८३६ च्या सुमारास हिंदुस्थानवर आक्रमण करण्याचा रशियन साम्राज्यशाहीचा बेत ब्रिटिशांच्या लक्षात आला. त्यामुळे इंग्रजांनी रणजितसिंगाबरोबर संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने १८३९ मध्ये नवा तह केला.

४० वर्षांच्या कारकीर्दीत, रणजितसिंगाने योग्य न्यायदानाची व्यवस्था निर्माण केली. हिंदू व मुसलमान यांना समान प्रजाजन म्हणून वागविले. शीख आणि हिंदू यांच्यामध्ये त्या वेळी भेद करीत नसत. शीख ही हिंदू समाजातलीच एक जमात मानत. त्याने शेती व उद्योगधंद्यांना उत्तेजन दिले. अराजक नाहीसे करून शांतता स्थापन केली. एक नवी शक्ती त्याने शीख संप्रदायाला दिली. पण त्याची राजकीय शक्ती ही वैयक्तिक होती. त्याने केलेले व्यक्तिगत पराक्रम, दाखवलेले चातुर्य व मुत्सद्दे्गिरी हे कमी लेखता येत नाही. ब्रिटिश सत्तेचा विस्तार बाकीच्या हिंदुस्थानात वेगाने होत होता; परंतु त्याने जवळजवळ अर्धे शतक ब्रिटिशांना रोखून धरले होते.

जेव्हा एका व्यक्तीच्या सामर्थ्याने आणि महिम्याने राज्य उभे राहते आणि ती राज्यशक्ती एका व्यक्तीतच केंद्रित होते

आणि त्या व्यक्तीपासून धोरण आणि ध्येय आत्मसात केलेले अनेक सामर्थ्यशाली राजकारणी त्या व्यक्तीनंतर उभे राहू शकत नाहीत. ते राज्य कितीही मोठे असले, तरी डबघाईस येऊन कोसळते. महाराजा रणजितसिंग याने भविष्य केल्याप्रमाणे १० वर्षांच्या आत पंजाबचे राज्य ब्रिटिशांनी खाल्ले. रणजितसिंगानंतर आलेल्यांमध्ये नेतृत्वाचे गुण असलेले कुणीच राहिले नाही. आपल्याशी स्पर्धा असणाऱ्यांचा निकाल लावण्याच्या कारस्थानामध्येच वरिष्ठ स्थानावरील व्यक्ती गुंतल्या. त्यांच्यात फाटाफूट होऊन अनेक गट तयार झाले. दारूचा विषारी चषक, छुपी कटचार आणि गुप्त कट या गोष्टींनी राजवंशातील महत्त्वाच्या व्यक्ती मृत्यू पावल्या. यांपैकी कित्येक माणसे रस्त्यातल्या सुरामारीला बळी पडली. पंजाबचा एकोपा जाऊन फाटाफुटीने विचका होऊ लागला. डोग्रा हिंदू सत्तेकरता शिखांशी संघर्ष करू लागले. मुसलमान तटस्थ राहिले. प्रशासन राहिले नाही. राज्याचा गोळा झालेला कर सेनेला पोसू शकत नव्हता. ब्रिटिशांना या अराजकतेची रणजितसिंगाच्या मृत्यूपूर्वीच कल्पना आली होती. रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या दरबारामध्ये ते तोंड खुपसू लागले. १८४५ मध्ये ते पंजाबवर स्वारी करण्याच्या तयारीस लागले. त्यानंतर शिखांशी अनेक लढाया झाल्या. प्रथम जलंदर दुआब ब्रिटिशांनी आपल्या राज्याला जोडला. जम्मू व काश्मीर गुलाबसिंग डोग्राच्या ताब्यात दिले. त्यानंतर मुलतान येथे बंड सुरू झाले. ते पसरण्याची वाट पाहिली आणि त्या बंडाचा बंदोबस्त करण्याच्या मिषाने महाराजा रणजितसिंगांचे सर्व राज्य खालसा केले व आपल्या साम्राज्याला जोडले.

१८४९ मध्ये सगळा पंजाब ब्रिटिशांनी ताब्यात घेतला आणि पंजाबमधली शिखांची सैनिक-शक्ती पुन्हा संघटित केली. शीख सैनिकांची लढाईतली कर्तबगारी त्यांना प्रत्यक्षच अनुभवास आली होती आणि इतिहासही त्यांनी तपासला. शिखांच्या पलटणी तयार केल्या.

महाराज रणजितसिंगांच्या काळात पश्चिम पंजाबचे हिंदू शीख पंथाच्या प्रभावाखाली आले. त्यांतले काही थोडे खालसा

पंथात गेले. बरेचसे हिंदू आदिग्रंथसाहिबाला मानू लागले, परंतु खालसा पंथात शिरले नाहीत. हिंदूंमध्ये प्रथमपासून चाल रूढ होती की, अनेक मुलगे असले तर एकांतरी मुलाला केशधारी शिखाची म्हणजे खालसा पंथाची दीक्षा द्यायची. हे बहुतेक खत्री, आरोरा व नहिया जातींतील हिंदू होत. हिंदू आणि शीख असा भेद असला तरी, लग्नाच्या बाबतीत म्हणजे मुलगी देण्याच्या बाबतीत हा भेद कधीच मानला गेला नाही. खालसा पंथाच्या बाहेर निरंकारी उपपंथ शिखांमध्ये तयार झाला. हा पंथ दयालदास या पेशावर येथील सराफी करणाऱ्या व्यापाऱ्याने सुरू केला. तो स्वतः गुरुपदापर्यंत पोहोचला. त्याला गुरू नानक यांच्या बेदी आडनावाच्या लोकांनी चांगला पाठिंबा दिला. शिवदयाल (१८१८–१८७८) नावाचा आदिग्रंथाचा अनुयायी. राधासोमी पंथाचा संस्थापक होऊन गेला. निरंकारी आणि राधासोमी हे १० गुरूंपर्यंतच थांबत नाहीत. गुरूंची परंपरा अतूट पुढे चालू ठेवतात.

बालकसिंग (१७९७–१८६२) हा सोनार जातीचा नामधारी शीख संप्रदायाचा पुरस्कर्ता झाला आणि त्याने आपला नवा पंथ निर्माण केला. त्याचे अनुयायी त्याला गुरू गोविंदसिंघाचा अवतार मानू लागले. या संप्रदायाला कूका असेही म्हणतात. कूका म्हणजे उच्च स्वरात नाचत भजन करणारा. त्यांचीसुद्धा गुरुद्वारानामक मंदिरे आहेत.

ब्रिटिशांनी पंजाबमधील कोरडवाहू जमिनींचा मोठा प्रदेश सुपीक करण्याकरता पाटबंधारे बांधण्यास सुरुवात केली. आधुनिक शिक्षणसंस्था निर्माण केल्या. पाटस्थळाच्या बाजूच्या नवीन जमिनींमध्ये नवी गावे वसू लागली. शेतकऱ्यांना त्यामुळे अपूर्व लाभ झाला. परंतु ही भरभराट थोडा वेळ टिकली. जमिनीच्या वाटण्या होऊन जमीन आर्थिक दृष्टया परवडणारी राहिली नाही. कर्जबाजारीपणा वाढला. अनेक कुटुंबे थोडीशी संपन्नता आल्याबरोबर तरुण पिढीला नवीन उद्योग शोधण्याकरता उत्तेजन देऊ लागली, काहींना भाग्योदयाकरता परदेशांतही पाठवू लागली. ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर,

थायलंड, कंबोडिया, फिलीपीन्स आणि चीन इ ठिकाणी शीख जमातींनी आपल्या वसाहती निर्माण केल्या. अधिक धाडशी शीख मंडळी पॅसिफिकला ओलांडून कॅनडा व युनायटेड स्टेट्समध्ये गेली. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरही काही उद्योजक जाऊन वसती करून राहिले. अमेरिकेत जे शीख गेले, त्यांना गोरा–काळा हा भेद जाचू लागला. गोरेशाहीची पक्षपाती वागणूक जाचक होऊ लागली. त्यामुळे तेथे मार्क्सवादाचाही प्रभाव पडू लागला.

शीख लष्कराने १८५७ सालच्या बंडात विशेषत: दिल्ली काबीज करण्याच्या प्रयत्नांत ब्रिटिशांना खूप मदत केली. असेही म्हणतात की, शीख सैनिकांची मदत नसती तर भारतावरील ब्रिटिशांचा कबजाच खलास झाला असता; परंतु पहिल्या जागतिक युद्धाच्या अखेरीस शीख व पंजाबी समाजाच्या मनामध्ये असलेला ब्रिटिशांबद्दलचा आदर पूर्ण खलास झाला.

१९१३ साली गदर पार्टीची अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिस्को शहरी स्थापना झाली. गदर हा अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ क्रांती असा आहे. गोऱ्यांचे राज्य उलथून टाकावयास पाहिजे, हे ध्येय या पक्षाचे होते. कॅनडा आणि अमेरिका येथे होणाऱ्या वांशिक पक्षपाताचा ब्रिटिश सरकारने किंवा तद्देशीय सरकारने बंदोबस्त करावा, अशी शिखांची अपेक्षा होती; परंतु त्या बाबतीत निराशा झाली. ब्रिटिश सरकार घटनादुरुस्ती करून सुधारणा जारी करी. त्या जनतेची अपेक्षा पूर्ण करणाऱ्या नव्हत्या. अमृतसर येथे (एप्रिल १९१९) जालियनवाला बागेत ब्रिटिशांनी जी कत्तल केली त्यामुळे असंतोषात अधिक भर पडली. जनतेच्या चळवळी दाबून टाकण्याकरता रौलॅक्ट ॲक्ट जारी केला आणि परंपरागत शीख महंतांच्या ताब्यातून गुरुद्वारे ताब्यात घेतली. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे सशस्त्र क्रांतीचा प्रयत्न होय.

गदर पार्टीचे भारतीय स्वातंत्र्य–आंदोलनाच्या इतिहासात एक विशिष्ट स्थान आहे. भारतातून गोऱ्यांचे राज्य नष्ट करू शकू, असा आत्मविश्वास १९०५ साली भारतीयांना आला. त्याचे

एक कारण जपानने पॅसिफिक महासागरात रशियाचा पराभव केला, हे होय. बंगालची फाळणी कर्झनशाहीमध्ये झाली; परंतु ती ब्रिटिशांना भारतामध्ये उफाळलेल्या जनतेच्या आंदोलनामुळे रद्द करावी लागली, हे दुसरे कारण होय. तिसरे कारण म्हणजे शीख आणि पंजाबी सुधारलेल्या पश्चिमी जगात पसरले तेव्हा त्यांना जनतेने केलेल्या दोन क्रांत्यांचा इतिहास समजला; त्या दोन क्रांत्या म्हणजे फ्रेंच क्रांती आणि अमेरिकन क्रांती होय. निरनिराळ्या देशांमध्ये पसरलेल्या भारतीयांची आणि शिखांची 'बंडाचा पडसाद', 'युद्धाचा पुकार', 'नवयुग', 'भारतातील ब्रिटिश राज्याच्या फायद्या–तोट्याचे दर्शनपत्र' या नावाची वृत्तपत्रे प्रसिद्ध होऊ लागली. त्यांमध्ये गदर पार्टीचे पत्र 'गदर' हे भारतात गुप्त मार्गे येऊ लागले. त्याचप्रमाणे कॅनडा, जपान, फिलीपीन्स, हाँगकाँग, चीन, मलाया, सिंगापूर, गिनी, त्रिनिदाद, होंदुरास, आफ्रिका इ. ठिकाणी गदर हे पत्र उघडपणे जाऊ लागले.

या पार्टीचे कार्य, जेथे जेथे भारतीय होते तेथे तेथे, झपाट्याने पसरले. ठिकठिकाणी गदर पार्टीचे जे नेते होते, त्यांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध सशस्त्र लढा देण्याची सिद्धता दाखवली. कॅनडा हा ब्रिटिश साम्राज्याचा भाग असल्यामुळे येथे युद्धाची तयारी करण्याऐवजी युनायटेड स्टेट्समध्ये तयारीला सुरुवात झाली. सॅक्रॅमेंटो या शहरी हिंदू लोकांची मोठी सभा भरली. हजारो लोकांनी भारतात जाऊन सशस्त्र क्रांतीच्या उठावाची तयारी दाखवली. त्यांच्याकरता प्रवासार्थ फंड गोळा झाला. भारतात जाणाऱ्या बोटींवर या लोकांनी गर्दी केली. पेशावर येथील रहिवासी रामचंद्र नावाच्या ब्राह्मणाने कॅलिफोर्नियातील गदर पार्टीचे नेतृत्व पतकरले. ज्वालासिंगाने क्रांतिकारांचे पहिले पथक भारतात आणले. अशा रीतीने ठिकठिकाणांहून परदेशातून अनेक क्रांतिकारकांची पथके भारतात येऊ लागली. यांच्यातील काही मंडळी ब्रिटिशांच्या लष्करातील हिंदी सैनिकांशी संपर्क ठेवायला लागली. १९१४ च्या डिसेंबरमध्ये गदर पार्टीचे सुमारे १००० लोक भारतात आले. ते भारतात आल्यानंतर

येथील सामान्य जनता आणि नेतेदेखील क्रांतीत भाग घ्यायला तयार नाहीत, ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आली. परंतु त्यांनी निराश न होता कार्य सुरू केले. १९१५ मध्ये येथील क्रांतिकारकांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. १९१२ साली लॉर्ड हार्डिग्जवर बाँबस्फोट करण्यात ज्यांनी नेतृत्व केले ते राजबिहारी बोस भेटले. राजबिहारी बोसच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सेनेतील हिंदी लष्करी ठाणी जिथे जिथे होती तेथे सैनिकांमध्ये ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याचा संकेत पसरविला. २१ फेब्रुवारी १९१५ ला उठाव करायचा असाही बेत निश्चित झाला; परंतु या बेताची माहिती ब्रिटिशांच्या गुप्तहेर संघटनेला मिळाली. सेनेतील अनेक सैनिकगटांना निःशस्त्र करण्यात आले. ज्यांच्याबद्दल शंका होती त्यांना कोर्टमार्शल करून फासावर लटकावले. बाहेरचे क्रांतिकारक सैनिकांच्या उठावाची वाट पाहत होते. ते पोलिसांच्या जाळ्यात सापडले. राजबिहारी बोस निराश होऊन पंजाबमधून गुप्त रीतीने निघून गेले. अशा रीतीने १९१५ च्या मे महिन्यात गदर पार्टीचा उठाव जवळजवळ दडपून टाकण्यात आला. शेकडो क्रांतिकारक निरनिराळ्या शहरांतून पकडले गेले. ४६ जणांना फाशी दिली गेली आणि १९४ क्रांतिकारकांना काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली. त्याशिवाय ब्रिटिश सेनेतील ज्यांच्याबद्दल वहीम होता, त्यांना गोळी घालून ठार करण्यात आले.

पहिले महायुद्ध संपल्यानंतर जवळजवळ २० वर्षे हिंदू आणि शीख समाज स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये एकजुटीने आणि समान आवेशाने भाग घेत राहिले. १९४० साली मार्चमध्ये मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या मागणीचा ठराव स्वीकारला. पंजाबमधील मुस्लिम लोकसंख्या अधिक असलेला प्रदेश या पाकिस्तानच्या मागणीत अंतर्भूत केला. त्यामुळे अनेक शतकांचे शीख-मुस्लिम संबंध ताणायला लागले; शिखांच्या मनात मुसलमानांच्या हेतूबद्दल अविश्वास उत्पन्न झाला. त्यांच्यापुढे विकल्प उभा राहिला तो असा की, इंडियन नॅशनल काँग्रेसशी एकरूप होऊन पाकिस्तानच्या मागणीला विरोध करायचा की स्वतंत्र शीख राज्याची मागणी करायची? पहिला

पर्याय पसंत करून काँग्रेसबरोबर राहून शीख राजकारण्यांनी पाकिस्तानमागणीच्या चळवळीला विरोध केला. मुसलमानांनी जिंकले. पाकिस्तानच्या निर्मितीच्या संधिकाळात व आधी मुसलमान व विरुद्ध हिंदू-शीख जमातींनी एकमेकांच्या कत्तली केल्या. पश्चिम पंजाबमध्ये– जो आज पश्चिम पाकिस्तानचा मुख्य भाग आहे– तेथे शिखांनी फार मोठ्या इस्टेटी निर्माण केलेल्या होत्या. चांगल्या चांगल्या इमारती, सुंदर मंदिरे, विस्तृत सुपीक जमिनी हे सर्व टाकून त्यांना भारतामध्ये आश्रय घ्यावा लागला. पूर्व पंजाबमध्ये जे मुसलमान होते त्यांना फार थोडे गमवावे लागले; कारण येथे त्यांनी काही फारसे कमावलेलेच नव्हते. पंजाबी शीख हा उद्योगी होता. त्याने प. पंजाबमध्ये आपले चांगले वैभव उभारले. पूर्व पंजाबात आल्यावर भारत सरकारने या निर्वासितांकडे विशेष लक्ष दिले नाही. त्याचप्रमाणे हिंदू धर्माच्या नव्या चळवळींनी विशेष उठाव केला. त्यामुळे शिखांमधील काही नेत्यांना पाकिस्तानप्रमाणे शीखस्तान अस्तित्वात यावे, अशी वासना उत्पन्न झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन धामधुमीमध्ये जपानचा विजय होऊ लागला. ही संधी साधून १९१५ पासून जपानचे रहिवासी बनलेले बंगाली क्रांतिकारक राजबिहारी बोस यांनी हिंदुस्थान स्वातंत्र्य संघ (इंडियन इन्डिपेन्डन्स लीग) स्थापन केला आणि जपानी सरकारला त्यांनी विनंती केली की, या इंग्लंडशी सुरू असलेल्या युद्धात हिंदवासियांना शत्रू म्हणून मानू नये आणि युद्धात जे हिंदी सैनिक सापडतील त्यांना माझ्याकडे आणावे. जपानच्या गुप्तहेर संघटनेचा एक प्रमुख मेजर फुजिवारा याला जपान सरकारने या बाबतीतले अधिकार दिले. राजबिहारी बोस यांना शिखांबद्दल गदर पार्टीच्या द्वारे पुष्कळ अनुभव आला होता. पकडलेल्या सैनिकांमध्ये शीख सैनिक हा महत्त्वाचा मानावा, असे ठरले. राजबिहारींनी थायलँड आणि मलाया येथील शीख मंडळी आणि शीख लष्करी आगारामध्ये असलेले ग्रंथी यांच्याशी संपर्क स्थापित केला. जपानी सेना जिथे जिथे आक्रमणार्थ जाईल तेथे तेथे

राजबिहारी बोस गेले आणि इंडियन इन्डिपेन्डन्स लीगच्या शाखा स्थापल्या. थायलँड आणि मलाया हे देश जपानी सेनेने पादाक्रांत केले. ब्रिटिश इंडियन सेनेतील पहिली व चौदावी पलटण जपानी सेनेनें जिंकली. हजारो भारतीय त्यात सापडले. त्यांतील कॅप्टन मोहनसिंग हाती पडला. त्याने जपानी सेनापतीला विनंती केली की, मी तुमच्या हाताखाली नोकरी करण्यास तयार आहे. त्याच्या हाताखाली भारतीय युद्धकैद्यांचा कँप सोपविला. तो थोड्या काळात चढत चढत इंडियन नॅशनल आर्मीचा कमांडर बनला. हेच सेनादल आय्. एन्. ए. म्हणून प्रसिद्धीस आले. आय्. एन्. ए. ची पहिली तुकडी जपान्यांच्या सिंगापूरवरील हल्ल्यात आघाडीवर होती. सिंगापूरला ४५ हजार हिंदी युद्धकैदी मिळाले. त्यातील २० हजार स्वखुशीने आय्. एन्. ए. मध्ये स्वयंसैनिक म्हणून प्रविष्ठ झाले. त्यांच्यामध्ये कर्नल नरिंजनसिंग गिल, मेजर महाबीरसिंग धिलन, मेजर रूपेंद्रसिंग भरत, कॅप्टन गुरुबक्षसिंग धिलन आणि कॅप्टन ठकरसिंग हे ऑफिसर होते. या २० हजारांमध्ये शिखांची संख्या निम्याहून अधिक होती. जनरल मोहनसिंग याने आपले कार्यालय सिंगापूरला स्थापले. त्याने जपानी फिल्ड मार्शलला विचारले की, माझी जबाबदारी या आक्रमणामध्ये काय आहे? त्याने उत्तर दिले की, राजबिहारी बोस यांनी टोकिओला बैठक बोलावली आहे त्यात या मुद्द्याची चर्चा होईल.

२८ मार्च १९४२ ला टोकिओला सभा भरली. त्यात दोन ठराव निर्णित झाले : १) 'कोणत्याही परकीय सत्तेपासून पूर्ण मुक्त स्वतंत्र हिंदुस्थान हे ध्येय; त्याकरिता हे आंदोलन करावयाचे.' २) 'भारताविरूद्ध लष्करी कृती आय्. एन् ए. मुख्यतः करील. इंडियन इन्टिपेन्डन्स लीगच्या कौन्सिलने केलेल्या विनंतीवरून जपानी अधिकाऱ्यांपासून जमीन, समुद्र आणि अंतरिक्ष यांमध्ये आवश्यक असलेल्या लष्करी वाहनांचे साहाय्य घेतले जाईल.' ह्या सभेमध्ये जपानचे प्रधान मंत्री जनरल तोजो यांनी भाग घेतला. यातील प्रतिनिधींची दुसरी बैठक (१५ जून १९४२) बँकॉकला भरली. तिच्या-

मध्ये आशियातील विविध देशांतील भारतीयांचे प्रतिनिधी उपस्थित होते, युद्धातील जपानच्या मित्रराष्ट्रांचेही प्रतिनिधी उपस्थित होते आणि असे ठरले की, टोकिओच्या सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे जपान सरकारने आपले ठरावास अनुकूल असे धोरण निश्चितपणाने जाहीर करावे. जपानच्या नेत्यांनी पूर्ण मौन पाळले. हिंदुस्थानबद्दलचे कोणतेही धोरण जाहीर केले नाही. तेव्हापासून हिंदी युद्धकैद्यांना अधिक वाईट वागणूक मिळू लागली. आय्. एन्. ए. वर जपानी कमांडरचे नियंत्रण भक्कम होऊ लागले. मोहनसिंगांनी आय्. एन्. ए. च बंद केले. मोहनसिंग हा पुन्हा जपान्यांच्या कैदेत गेला. राजबिहारी बोस निराशेने परतले. सुभाषचंद्र बोस जून १९४३ मध्ये जर्मनीतून जपानने जिंकलेल्या प्रदेशात आले आणि त्यांनी आय्. एन्. ए. चा ताबा घेतला व इंडियन इन्डिपेन्डन्ट लीगचे ते अध्यक्ष झाले. सुभाषचंद्र बोसांनी भारताचे स्वतंत्र सरकार 'आझाद हिंद' स्थापले; जपानी अधिकारी व सत्ताधारी नेताजी सुभाष बोस यांच्याशी अधिक सहकार्य करायला लागले. १९४४ च्या फेब्रुवारीमध्ये आय्. एन्. ए. ब्रिटिश लष्कराशी लढले; आणि आय्. एन्. ए. चा प्रवेश भारताच्या सरहद्दीत झाला. ब्रिटिशांनी हा भाग ऐन पावसाळ्यात पुन्हा काबीज केला व आय्. एन्. ए. ला मागे दडपले. जपान्यांनी कसलेही साहाय्य केले नाही. १९४५ च्या मे महिन्याच्या मध्याला आय्. एन्. ए. चा हा शौर्याचा प्रयत्न फसला.

७ मे १९४५ ला नात्सी जर्मनीने युद्ध थांबविले आणि शरणागती पत्करली. सर्व आघाड्यांवरून जपानची माघार सुरू झाली. ब्रिटिशांनी काँग्रेस नेत्यांना जेलमधून मुक्त केले. भारताचे व्हाइसराय लॉर्ड वेव्हेल यांनी २१ भारतीय नेत्यांना भेटीकरता बोलावले, त्यात शीख नेते मास्टर तारासिंगही होते. प्रश्न कायमचा निकालात लावण्याच्या अगोदर व्हाइसरायने आपले कार्यकारी मंडळ केवळ भारतीय सदस्यांचे निर्माण करण्याचा उद्देश नेत्यांना कळवला. जून १९४५ च्या शेवटच्या आठवड्यात नेते जमले आणि तिथे जिनांनी

मागणी केली की, भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्व केवळ मुस्लिम लीगलाच आहे. जिनांचे हे म्हणणे काही काँग्रेस नेत्यांना पटले.

ब्रिटिश सरकारने असे ठरवले की, स्वतंत्र भारताचे संविधान (घटना) तयार करण्याकरता संविधान समिती तयार करायला पाहिजे, म्हणून निवडणुका घेतल्या पाहिजेत. मुसलमानेतर मतदारांनी इंडियन नॅशनल काँग्रेसच्या प्रचंड नेत्यांना मतदान करून मोठ्या संख्येने निवडून आणले. शिखांनी पाकिस्तानला विरोध दाखवण्याकरता पांथिक प्रतिनिधी मंडळ स्थापन केले होते. पंजाबच्या विधानसभेत १७५ जागा होत्या. मुसलमानांनी त्यांतील ७९ मिळविल्या, काँग्रेसला ५१, पांथिक प्रतिनिधी मंडळाला २२ मिळाल्या व राहिलेल्यांना १० मिळाल्या. इंग्लंडमध्ये त्या वेळेस मजूर सरकार होते. अटली पंतप्रधान होते. १९४६ च्या वसंत ऋतूत पंतप्रधान अटलींनी आपल्या मंत्रिमंडळातील व्यक्तींचा आयोग निर्माण करून भारतीय स्वातंत्र्याच्या बाबतीत पुढचे पाऊल टाकण्याकरता पाठवला. चर्चा झाल्यानंतर काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यामध्ये समान भूमिका आहे किंवा नाही, हे तपासण्याकरता सिमला येथे चर्चा केली आणि त्या इंग्लिश आयोगाने १६ मे ला जाहीर केले की, उभयपक्षी मान्य असलेल्या समान तत्त्वांच्या आधारावर भारताची संविधान समिती तयार व्हावी. शिखांचा पाकिस्तानविरोधही त्यांनी आपल्या आवेदनात नोंदविला. व्हाइसरॉयने काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना निमंत्रित करून सरकार निर्मिण्याची विनंती केली. लीगने त्या सरकारात जाण्याचे नाकारले. मात्र शीख नेते त्या सरकारमध्ये सामील झाले. बलदेवसिंगांना संरक्षणमंत्री म्हणून अधिकार सोपवला. जिनांनी द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करून ब्रिटिशांकडून पाकिस्तानची मागणी मान्य करून घेतली. त्यानंतर पंजाब व पूर्व बंगालमध्ये यादवी सुरू झाली. निर्वासितांचे लोंढे दोन्ही बाजूला प्रचंड संख्येने जाऊ लागले. जाता जाता कत्तली सारख्या सुरू होत्या. एवढ्या मोठ्या प्रमाणात मानवी संहार मानवी इतिहासात कधीही झाला नाही, असे इतिहासकार म्हणतात.

रॅडक्लिफ आयोग पाकिस्तान आणि भारत यांच्या सरहद्दी ठरवण्याकरता नेमण्यात आला. रॅडक्लिफ यांनी पंजाबची फाळणी केली. पूर्व पंजाबला म्हणजे हिंदू, शीख बहुसंख्य ज्या पंजाबच्या प्रदेशात, त्या प्रदेशाला १३ जिल्हे दिले. बाकीचा ६२% भूप्रदेश म्हणजे पश्चिम पंजाब पाकिस्तानला मिळाला. यात ५५% लोकसंख्या त्या वेळी होती. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताने आपला पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला. पूर्व पंजाबमध्ये पोलीस दलातील मुसलमान काढून टाकले. चेतलेले शिखांचे जथे आणि आर. एस्. एस्. संघटना यांनी कहर केला.

फाळणीने पंजाबमध्ये आर्थिक, राजकीय आणि सामाजिक रचनेमध्ये मौलिक बदल घडून आला. फाळणीपूर्वीच्या पंजाबमध्ये शीख इतर भारतीय जमातींपेक्षा पुढारलेले होते. त्यांच्यातले शेतकरी आणि व्यापारी यांची भरभराट होती. पूर्व पंजाबमध्ये नव्या कायद्याप्रमाणे ३० एकरपेक्षा अधिक जमीन बाळगायला बंदी होती. शहरवासी शिखांचे दैन्य तर अधिकच होते. या नव्या आलेल्या निर्वासित शीख व्यापाऱ्याला पाकिस्तानातून आलेल्या निर्वासिताशी व तेथील हिंदू व्यापाऱ्याशी स्पर्धा करावी लागली. भंगी, मोची, चांभार, कुंभार, लोहार, विणकर या निर्वासितांची स्थिती सुधारली. त्यांना जमिनी मिळाल्या.

या संकटाला दुसरी मोचक बाजू होती. ३० एकर जमीन ज्याच्या मालकीची झाली, त्याला कूळ ठेऊन जमिनीचा ठरावीक वाटा देऊन जमिनीची मशागत करवून घेणे शक्य झाले नाही. तो स्वतःच जमीन कसू लागला. न कसणारा जमीनमालक जवळजवळ नामशेष झाला. हा नवा शेतकरी साठलेला पैसा ट्रॅक्टर, विहीर व इतर आधुनिक शेतीची साधने मिळवण्याकरता वापरू लागला. शेतीस सहकारी समित्या सुधारित बी-बियाणे पुरवू लागल्या. खतांचे साठे हे खेड्यांचे समान वैशिष्ट्य बनले. पशुपालनाकरता चांगले तंत्रज्ञान वापरण्यात येऊ लागले. दूधपुरवठा फायदेशीर होऊ लागला. कोंबडीपालनाकडे लक्ष केंद्रित झाले. परदेशातून आलेल्या पक्ष्यांचे

महत्त्व शेतकऱ्यांना पटू लागले. या सगळ्या बाबतीत शीख शेतकऱ्याने आपले नेतृत्व स्थापन केले. पंजाब हा तुटीचा प्रदेश होता तो समृद्धीचा प्रदेश बनला. पंजाबी शीख शेतकरी नव्या-नव्या जमिनी सुधारून पिकाखाली आणू लागला. इतर प्रांतांतील लोकांचे पंजाब शेतकरी हा आकर्षण बनला. शीख पुरुष, बाई किंवा मूल रस्त्यात भीक मागताना दिसेनासे झाले. धैर्य आणि चिकाटी हे शिखाचे लक्षण ठरले.

परंतु ही संपन्नता प्राप्त होण्याकरता शीख व्यापारी व शेतकरी यांना पुनर्वसनाकरता कर्ज मिळवण्याच्या बाबतीत अधिकारीवर्गाने फार ताण दिला. पुन्हा धंदा करण्याला व्यापाऱ्याला पुरेसे कर्जच मिळेना. ते म्हणू लागले की, पाकिस्तान मुसलमानांना, हिंदुस्थान हिंदू लोकांना मिळाले; पण शिखांना काय मिळाले ? त्यांच्या डोळ्यांपुढे आदर्श शीखराज्य दिसायला लागले.

सरकार शिखांशी अत्यंत निर्बुद्धपणे वागू लागले. रस्त्यातील मालवाहतूक मुख्यतः शिखांच्या ताब्यात होती. मालवाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे वाहतुकीचा ताबा शिखांच्या हातून गेला. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थान या प्रदेशांतील शीख रहिवाशांकडे तेथील नागरिक ' हे परके आहेत ' अशा दृष्टीने पाहू लागले. पश्चिम पाकिस्तानमधून येणाऱ्या कलकत्त्यातील हिंदू निर्वासितांकरिता शिखांच्या ताब्यात असलेली टॅक्सी आणि बस-वाहतूक बंद केली. लष्करामध्ये किंवा मुलकी सेवेमध्ये भरती झाल्यावर शिखांना नोकरी करायची तर आणि वर चढायचे तर केशधारण व कृपाणधारण करणे अडचणीचे होऊ लागले. वस्तुतः राज्य इहवादी असल्यामुळे अशी धार्मिक चिन्हे धारण करणे कमी प्रतीचे मानले जाऊ लागले; परंतु सनातनी शीख म्हणू लागले की, हे सगळे लुच्चा हिंदू सरकारचे धोरण आहे.

शिखांच्या असंतोषाचे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदू धर्माचा प्रभाव खूप वाढू लागला, हे होय. हिंदूंच्या धार्मिक संघटनांची संख्या फुगायला लागली. विशेषतः हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून आग्रह सुरू

झाल्यामुळे या बाबतीत पंजाबी हिंदू हा अधिक आक्रमक बनला. आर्य समाज आणि जनसंघ यांचा हा प्रताप आहे, असे शीख मानू लागले. त्यांना असे दिसले की, पंजाबी भाषिक हिंदूंनी त्यांची मातृभाषा पंजाबी सोडून हिंदीचा स्वीकार करण्याचे हिंदूंचे अभियान सुरू झाले. शीख नेतृत्वाला एक प्रकारचे आव्हान यात दिसू लागले. वरवर पाहता सरकार इहवादाचा पुरस्कार करते; परंतु प्रत्यक्ष आचार हा हिंदुत्वाला महत्त्व देतो. आर्थिक आणि राजकीय प्रश्नांपेक्षा भाषिक प्रश्न शिखांना महत्त्वाचा वाटू लागला. पंजाब भाषिक प्रदेश राज्य किंवा स्वतंत्र पंजाबी राज्य याची मागणीच पंजाबी भाषा, शीख धर्मग्रंथ व इतिहास यांना धरून उपयुक्त ठरेल, त्याशिवाय खालसा पंथाचा महिमा टिकणार नाही, असे शिखांच्या ध्यानात आले.

स्वातंत्र्योत्तर काळी पंजाबी सुभ्याची मागणी प्रखर झाली. गुरुमुखी लिपीमधली पंजाबी भाषा या सुभ्याची भाषा होय; या सुभ्याची मागणी म्हणजे शीख स्वतंत्र राज्याचीच मागणी असा अर्थ भारताच्या केंद्रस्थानी असलेल्या हिंदी भाषिक नेत्यांनी केला. ते म्हणू लागले की, ही केवळ भाषिक प्रदेशाची मागणी नाही; भाषिक हे मागणीचे साखरी पुट आहे. भारताची प्रदेशराज्ये बहुतेक बहुभाषिक स्वरूपातच भारताच्या ताब्यात आली. आंध्र, तमिळ आणि कर्नाटक प्रदेश मिळून एक मद्रास राज्य; मराठी, गुजराती आणि कानडी मिळून मुंबई राज्य अशा तऱ्हेच्या अनेक भाषिक राज्यांमध्ये वेगळ्या भाषिक प्रदेश राज्याच्या मागणीला जोर येऊ लागला. वस्तुतः घटनासमितीनेच हा प्रश्न निकालात काढावयास पाहिजे होता; परंतु निरनिराळे भाषिक प्रदेश हे एकमेकांत अडकून ठेवले म्हणजे भारताची राष्ट्रीय एकात्मता दृढ होईल; नाहीतर वेगवेगळी भाषिक राज्ये भारत राष्ट्रातून फुटून जाण्याचा प्रयत्न करतील अशा भयाने केंद्रस्थानी असलेले सत्ताधारी नेते ग्रासले होते. भारताची एकात्मता निर्माण होण्या-करता एक राष्ट्रभाषा असावी व ती म्हणजे हिंदी असावी

हा त्यांच्या खोल मनामधील आशय होता. तो त्यांनी बोलून दाखवला नाही पण कृतीने दाखवला. केंद्र राज्याच्या इंग्लिश व हिंदी या दोन भाषा राज्य व्यवहाराच्या भाषा ठरविल्या; हे त्या खोल आशयाचे दर्शक चिन्ह होय. वस्तुतः पश्चिमी राष्ट्रांचा, यूरोपियन व अमेरिकन राष्ट्रांच्या राष्ट्रीयतेचा इतिहास पाहिला तर स्वित्झर्लंड व कॅनडा यांचा अपवाद सोडल्यास बहुतेक पश्चिमी राष्ट्रे ही एकभाषिक राष्ट्रे आहेत. अमेरिका-संयुक्त संस्थाने हे एक-भाषिक राष्ट्र असूनदेखील ते संघराज्य आहे. संघातील प्रत्येक राज्याला विशिष्ट अधिकार आहेत. त्याच्यात केंद्र सरकारला हस्त-क्षेप करता येत नाही. तशी स्थिती भारताच्या संघराज्याची नाही. याला 'इंडियन यूनियन' म्हणतात. म्हणजे अनेक राज्यांचा संघ; परंतु प्रदेशराज्यांना स्पष्ट असे वेगळे अधिकार थोडे आहेत.

भाषिक राज्याच्या मागणीला प्रथम प्रक्षोभक रूप आंध्रात आले. आणि हा प्रक्षोभ वाढत जाणार; शमणार नाही अशी खात्री झाल्याने नाखुशीने आंध्र प्रदेश राज्याची केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी निर्मिती केली. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचीही उपेक्षा केंद्र सत्ता-धारी सतत करत होते. परंतु महाराष्ट्रात प्रथम आणि गुजरातेत नंतर प्रक्षोभ अनावर झाला. काँग्रेसचे राज्य बहुभाषिक मुंबई राज्यात राहणार नाही, काँग्रेस बहुमताने निवडून येणार नाही अशी बालंबाल खात्री झाल्याने केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला अनुकूल प्रतिसाद दिला. मराठी व पंजाबी यांची राज्ये काबीज केल्यावरच इंग्रजी राज्याची भारतात स्थापना होऊ शकली. त्यामुळे महाराष्ट्र आणि पंजाब हे भारतापासून फुटून स्वतंत्र होण्याचे भय केंद्रीय सत्ताधारी मनात बाळगत होते, असे अनुमान करण्यास मुळीच हरकत नाही. वस्तुतः भारताच्या मुक्तीचे आत्मबलिदानपूर्वक नेतृत्व विशेषतः पंजाब, बंगाल व महाराष्ट्राने केले हे नुकताच घडलेला इतिहास सांगतो. आणि विशेषतः भारताच्या एकराष्ट्रीयत्वाचा ध्येयवाद प्रथम दादाभाई नवरोजी, लो. टिळक, महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण

गोखले यांनीच नीट रीतीने मांडला. महाराष्ट्रीय हेच भारताच्या एकराष्ट्रीयत्वाचे पहिले उद्गाते हे केंद्रीय सत्ताधारी विसरले म्हणून त्यांनी प्रथम महाराष्ट्राला विरोध केला. हिंदी भाषिक प्रदेशांना अगदी लागून पंजाब प्रदेश आहे. शीख जमात ही गेली ४०० वर्षे धर्मरक्षणार्थ आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यार्थ झगडत आहे, तरी सरळ शुद्ध मनाने पंजाबी सुभा त्यांना मिळत नाही; दिला तो अनेक अडचणी ठेऊन दिला.

'शीख' या विषयाचा अभ्यास करताना दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात येतात, त्या म्हणजे शीख हे आणि विशेषतः खालसा पंथ हा हिंदू धर्मामध्ये विलीन होण्याचे नाकारतो. त्याकरता प्रतिकार करतो. दुसरी गोष्ट म्हणजे शीख राज्याच्या मागणीला दिवसेंदिवस तीव्रता येत आहे.

परंतु हिंदू धर्मामध्ये समाविष्ट होण्याची प्रक्रिया अलीकडे हळूहळू वाढत आहे. याचे मुख्य कारण इहवादी जीवनपद्धती, हिंदू आणि शीख यांच्यामध्ये पसरत आहे. विशेषत: श्रीमंत आणि शिक्षितांमध्ये अधिक दृढ होत आहे. मिशा आणि दाढी काढून टाकणे व डोक्यावरचा केशभार मर्यादित प्रमाणातच ठेवणे, ही प्रवृत्ती पसरत आहे. हातातले कडे तेवढे धार्मिक समारंभात नव्या तरुण शिखांच्या हातात दिसते; तरी सनातनी खालसा त्याला पतितच समजतो. त्यामुळे खालसांना भीती वाटते की, हे सगळे हिंदू धर्मामध्ये सामील होत आहेत. परंतु खालसा हा शिखांचा उपपंथ सोडल्यास आदिग्रंथाला मानणारे नानकपंथी शीख कोट्यवधी आहेत; उदा., सहजधारी शीख. सहजधारींना हिंदू धर्माच्या अर्ध्या वाटेवर गेलेले शीख असे मानतात. अनेक आदिग्रंथाचे अनुयायी हिंदू देवांचीही उपासना करतात. शिखांना अशी भीती वाटते की, शीख धर्माचा सिंधी लोकांमध्ये लोप होणार आहे. पण सनातनी शिखांच्या हे लक्षात येत नाही की, हिंदू धर्मातील लोकांमध्येसुद्धा इहवादी प्रवृत्ती हळूहळू वाढत आहे. उदा., हिंदूची शेंडी नष्ट होत आहे. आता शिखांना असे वाटत आहे की,

आपण नवे पंजाबी राज्य निर्माण केल्याशिवाय आणि त्यामध्ये शीख धर्म हा आवश्यक मानल्याशिवाय खालसा पंथाला गत्यंतर नाही.

संघराज्यातील घटकराज्याला जे अधिक अधिकार पाहिजेत, त्यांची मागणी तीव्र करण्यापेक्षा शिखांनी ती मागणी पुरी करण्याकरता मधल्या पायऱ्या मिळवल्या पाहिजेत. चंडीगढ ही राजधानी म्हणून मिळवण्याकरता हट्ट धरावा, रावी-बियासच्या पाण्याचा वाटा वाढवून घ्यावा, हिंदी भाषिक प्रदेशांना जोडलेले पंजाबी भाषिकांचे सलग असलेले पंजाबी भाषिक प्रदेश मिळवण्याबद्दल आग्रह धरावा. हे मिळवल्यानंतर हळूहळू लक्षात येईल की, केंद्र सरकारच्या आजच्या अधिकारकक्षा अधिक मर्यादित करण्याचा आग्रह धरण्याची जरूरी नाही. ही गोष्ट, द्रविडस्तान मागणाऱ्या तमिळनाडूचे द्रविड मुन्नेत्र कळघम आणि त्यातून वेगळे झालेले अनेक विभाग यांनी द्रविडस्तानची मागणी बर्फाच्या पेटीमध्ये बंद करून ठेवली आहे; यावरून लक्षात येईल.

◊ ◊ ◊

आधारग्रंथ

१. A History of Sikhs –by Khushwant Singh.

२. Secular Perceptions in Sikh Faith –by K. S. Duggal.

३. Histoey of the Sikhs –by J. D. Cunningham.

४. The Punjab's Pioneer Freedom Fighters –by M. L. Ahluwalia and Kirpal Singh.

५. Kukas, The Freedom Fighters of the Punjab –by M. M. Ahluwalia.

६. The Mughul Empire, Vol. VII, Bhartiya Vidya Bhavan.

७. शिखांचा इतिहास, न. वि. गाडगीळ.

८. शीखपंथ दर्शन, सरदार ईश्वरसिंघ ठाकूर.

कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमालेतील आगामी प्रकाशने

* स्वातंत्र्यचळवळीची विचारपद्धती : ले. मधु लिमये
* आजची कामगार चळवळ व ध्येयवाद
* भारत व त्याचे शेजारी
* महात्मा गांधी व आजचे हिंसामय वातावरण
* स्त्री-मुक्ती आंदोलन

एकमेव विक्रेते : अक्षर भांडार,
५८६ सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे- ३०.
फोन- ४४४२१६